शनिवार, १४ जानेवारी २०२३
⊙ किंमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -१४६
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६


# आधुनिक केसरी



● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● SATURDAY 14 JANUARY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-146 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5

# निष्काळजीपणा : ११ पोलिसांचे निलंबन

## अंजली सिंह अपघाती मृत्यू प्रकरणी केंद्रीय गृहमंत्रालयाची कारवाई



आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : निष्काळजीपणाचा ठपका ठेवत दिल्लीतल्या कंझावाला अपघाताचे प्रकरण मागच्या १३ दिवसांपासून चर्चेत आहे. अंजली तिच्या स्कुटीवरून चालली होती. त्यावेळी तिला एका कारने धडक दिली. या धडकेत अंजलीला १२ किमी फरपटत नेण्यात आलं. या घटनेत तिचा मृत्यू झाला. १ जानेवारीच्या पहाटे अंजलीचा मृतदेह विवस्त्र आणि छिन्नविछिन्न अवस्थेत आढळला होता. आता या प्रकरणात निष्काळजीपणा केल्याचा ठपका ठेवत ११ पोलिसांचे निलंबन करण्यात आले आहे.**

दिल्ली पोलिसांच्या वरिष्ठ अधिकारी शालिनी सिंह यांनी दिलेल्या अहवालानंतर केंद्रीय गृहमंत्रालयाने ही कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन आणि समोर आलेले साक्षी पुरावे यांच्या आधारे या प्रकरणात पोलिसांनी आरोपींवर कलम ३०२ लावावे आणि त्या अनुषंगाने पुढील प्रक्रिया आणि कारवाई करावी असेही निर्देश देण्यात आले आहेत. अंजलीचा अपघात १२ किमी फरपटत नेलं गेल्याने झाला. तिचा मृतदेह छिन्नविछिन्न अवस्थेत आढळला. तसेच ती आपल्या कारमध्ये अडकली आहे याची माहिती आरोपींना होती. तरीही तिला तसंच फरपटत नेण्यात आले. या १२ किमी रस्त्यात एकही पोलीस व्हॅन, गस्त पथक का नव्हते? हा प्रश्न आहेच. अशात आता केंद्रीय गृहमंत्रालायाने या प्रकरणात ११ पोलिसांच्या निलंबानाचा निर्णय घेतला आहे.

३१ डिसेंबरच्या रात्री अंजली सिंह ही मुलगी तिच्या आईला मी रात्री १० वाजेपर्यंत घरी परत येते असं सांगून बाहेर पडली होती. ती परत आलीच नाही. दुसऱ्या दिवशी पहाटे तिचा मृतदेह पोलिसांना छिन्नविछिन्न आणि विविस्त्र अवस्थेत आढळला. राजधानी दिल्लीत नव्या वर्षाच्या पहिल्याच दिवशी ही घटना घडली या घटनेमुळे सगळा देश हादरला. १ जानेवारीला ही घटना घडत असताना एका प्रत्यक्षदर्शीने पाहिले होते. एका कारच्या मागे पहाटे ३ च्या दरम्यान एका मुलीचे प्रेत फरपटत चालले होते. या घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली. त्यानंतर पोलिसांना कंझावाला या ठिकाणी या मुलीचा म्हणजेच अंजलीचा मृतदेह आढळला. तो मृतदेह सापडला तेव्हा त्या मृतदेहावर एकही कपडा नव्हता. अपघातानंतर झालेली फरपट इतकी भीषण होती की अंजलीचे काही अवयवही गायब झाले होते. या प्रकरणात पोलिसांनी कारच्या नंबरवरून सहा जणांना अटक केली.

तर सातव्या आरोपीला नंतर अटक केली. मात्र त्याला जामीन मंजूर झाला आहे. अंजलीच्या मृत्यू प्रकरणाची सुनावणी सुरू असताना पोलिसांनी एक सीसीटीव्ही फुटेजही सादर केले. त्यात एक आरोपी कारमध्ये अंजली अडकली आहे हे पाहतो. मात्र तो तिला मदत करत नाही. सगळे कारमध्ये परत बसतात आणि कार पळवू लागतात. पोलिसांनी सोमवारी सगळ्या आरोपींना कोर्टात सादर केले होते. कारण त्यांची पोलीस कोठडी संपली होती. आता न्यायालयाने या सगळ्यांची रवानगी न्यायालयीन कोठडीत केली आहे.

## चर्चेतली बातमी

### चित्रा वाघ यांच्याविरोधात उर्फीने दाखल केली तक्रार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** सोशल मीडिया सेन्सेशन उर्फी जावेद आणि भाजपा नेत्या चित्रा वाघ यांच्यात मागील काही दिवसांपासून वाद सुरु आहे. उर्फी जावेदच्या तोकड्या कपड्यांवर चित्रा वाघ यांनी आक्षेप घेतला होता. याप्रकरणी उर्फी जावेदवर कारवाई करावी, अशी मागणी मुंबई पोलिसांकडे चित्रा वाघ यांनी केली होती. तसेच, उर्फी समोर आली तर थोबडवणार, असं वक्तव्य चित्रा वाघ यांनी केले होते. यानंतर आता उर्फी जावेदने चित्रा वाघ यांच्याविरोधात पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. उर्फीचे वकील नितीन सातपुते यांनी याबाबत माहिती दिली आहे. 'ईटाइम्स'ने दिलेल्या वृत्तानुसार, नितीन सातपुते म्हणाले, "भाजपा नेत्या चित्रा वाघ यांच्याविरोधात धमकी दिल्याप्रकरणी आयपीसी कलम १५३ (ए) (बी) ५०४, ५०६ आणि ५०६(आय आय) अंतर्गत तक्रार दाखल केली आहे. अभिनेत्री व मॉडेल उर्फी जावेदला त्रास दिल्याप्रकरणी सीआर पीसी १४९ आणि १०७ अंतर्गत कारवाई करण्याची विनंती केली आहे. चित्रा वाघ यांच्याविरोधात तक्रार केल्याचा मेल महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी पाठवला आहे.

# काँग्रेसला स्वत:चीच माणसे सांभाळता येत नाहीत

## चंद्रशेखर बावनकुळे यांची टीका

आधुनिक केसरी न्यूज



**नागपूर :** काँग्रेसला स्वतःचीच माणसे सांभाळता येत नाहीत. त्यामुळे ते दुसऱ्यावर टीका करतात. त्यांनी प्रथम आपले घर वाचवावे. त्यांचे घर कच्चे झाले आहे. त्यामुळे त्यांच्या प्रदेश आणि केंद्रीय नेतृत्वावर आज प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे, अशी टीका भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्यावर केली. बावनकुळे नागपुरात प्रसार माध्यमांशी बोलत होते. देशातील आणि महाराष्ट्रातल्या काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना वाटते की काँग्रेस डुबते जहाज आहे. त्यामुळे त्या जहाजावर कोणीही बसायला तयार नाही. अमित देशमुख यांनी मी ज्या घरात आहे त्याच घरात राहणार आहे असे सांगितले असले तरी काळ ठरवेल. जर तरला अर्थ नाही. २०२४ मध्ये महाविकास आघाडीच्या तीनही पक्षाला उमेदवार सुद्धा मिळणार नाही. सत्यजीत तांबे यांनी अजूनही आम्हाला पाठिंबा मागितला नाही. आमच्याकडे आले तर आमच्या राज्य आणि केंद्रीय संसदीय मंडळाकडे हा विषय जाईल आणि ते निर्णय घेतील. आमच्या तीन उमेदवारांनी अर्ज भरले. मात्र त्यांना एबी फॉर्म दिले नाही, असेही बावनकुळे म्हणाले.

# आमदार सुनील केदार यांना एक वर्षाची शिक्षा

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** सरकारी कर्मचाऱ्याला मारहाण केल्याप्रकरणी काँग्रेस आमदार सुनील केदार यांना एका वर्षाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. 2017 मध्ये महापारेषणच्या साहाय्यक अभियंत्यासह कर्मचाऱ्याला मारहाण केल्याप्रकरणी सुनील केदार यांना दोषी ठरवण्यात आले आहे. नागपूर जिल्हा सत्र न्यायालयानं आज हा निर्णय दिला आहे. नागपूर येथील केळवद पोलीस स्टेशनमध्ये सुनील केदार यांच्याविरोधात सरकारी कर्मचाऱ्याला मारहाण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल होता. 2017 मध्ये कोराडी ते तिडंगीदरम्यान अतिउच्च दाबवाहिनीचे काम करणाऱ्या महापारेषणच्या साहाय्यक अभियंत्यासह कर्मचाऱ्यांना सुनील केदार यांनी मारहाण केली होती. या प्रकरणी नागपूर जिल्हा सत्र न्यायालयाने एक वर्षाची शिक्षा सुनावली आहे. काँग्रेस आमदार सुनील केदार यांना नागपूर जिल्हा सत्र न्यायालयाने 353 च्या गुन्हयात 1 वर्षांची शिक्षा व दोन हजार रुपयाचा दंड सुनावला आहे. 2017 मध्ये नागपूर जिल्हयातील तेलगाव येथे शेतकऱ्यांच्या शेतातून महापारेषणचे टॉवर टाकण्याचे काम सुरु होते. त्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकाचे नुकसान होत होते व शेतकऱ्यांना त्याची नुकसानभरपाई देखील मिळत नव्हती त्यामुळे शेतकऱ्यांनी आमदार म्हणून त्याची तक्रार सुनील केदार यांच्या कडे केली. त्यानंतर लगेच सुनील केदार हे घटनास्थळी पोहचले उपस्थित इंजिनिअर व महापारेषण च्या कर्मचाऱ्यांना मारहाण करत काम बंद पाडले .

# खोट्या बातम्या देत दिशाभूल; सहा यूट्युब चॅनेलवर कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** खोट्या बातम्या पसरवल्याप्रकरणी सहा यूट्युब चॅनलवर केंद्र सरकारने कारवाई केली आहे. या चॅनलचे सुमारे २० लाख सबस्क्रायबर आहेत. माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या वृत्त सूचना कार्यालय (पीआयबी)च्या तथ्यशोधन विभागाने ही माहिती दिली. ही सहा यूट्युब चॅनेल एकमेकांच्या सहकार्याने काम करून चुकीची माहिती प्रसृत करत होती. त्यांचे व्हिडीओ ५१ कोटी जणांनी पाहिले होते. ही सहा यूट्युब चॅनेल निवडणुका, सर्वोच्च न्यायालयातील सुनावण्या, संसदेमधील आणि सरकारच्या अन्य यंत्रणांमधील कामकाजासंदर्भात खोट्या बातम्या पसरवत होती. कारवाई केलेल्या वाहिन्यांमध्ये नेशन टीव्ही (पाच लाख ५७ हजार सबस्क्रायबर्स), संवाद टीव्ही (१० लाख नऊ हजार), सरोकार भारत (२१ हजार १००), नेशन २४ (२५ हजार ४००), स्वर्णिम भारत (सहा हजार ७०), संवाद समाचार (३.८४ लाख) यांचा समावेश आहे. तथ्यशोधन समितीने संवाद समाचार, संवाद टीव्ही आणि नेशन टीव्ही या यूट्युब चॅनलवर कारवाई केल्यानंतर त्यांनी त्यांची नावे अनुक्रमे इनसाइड इंडिया, इनसाइड भारत आणि नेशन वीकली अशी ठेवली आहेत, अशी माहिती विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली. या चॅनेलने ईव्हीएमवर बंदी आणल्याचा खोटा दावा केला होता. तसेच, राष्ट्रपती आणि सरन्यायाधीशांशी संबंधीत खोटी वक्तव्ये केली होती. बातम्या विश्वासार्ह वाटाव्यात, यासाठी या चॅनेलवरून खोटे, सनसनाटी दावे केले जात. तसेच, टीव्ही चॅनलच्या वृत्तनिवेदकांची छायाचित्रे वापरून प्रेक्षकांची दिशाभूल केली जात असे. त्यामुळे प्रेक्षक हे व्हिडीओ पाहात आणि त्यायोगे या चॅनेलना पैसे मिळत असत.

# मुंबईत सिमेंट-कॉंक्रिटच्या रस्ते कंत्राटात घोटाळा

## कंत्राटदारांना 48 टक्के फायदा; आदित्य ठाकरेंचा शिंदे सरकारवर गंभीर आरोप

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मुंबई महापालिकेची लूट या सरकारकडून केली जात आहे. या सरकारने काढलेल्या रस्त्याच्या टेंडला कोणीही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे हे टेंडर रद्द करावे लागले. त्यानंतर आता नवं टेंडर काढण्यात आले. 400 किलोमीटरच्या रस्त्यांसाठी 6080 कोटी रूपयांचे हे टेंडर काढण्यात आले. या टेंडमधून कंत्राटदारांना 48 टक्के फायदा करून देण्यात आला. त्यामुळेच मुंबईतील सिमेंट-कॉंक्रिटच्या रस्ते कंत्राटात घोटाळा झाल्याचा आरोप युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांनी केलाय. मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. मुंबईतील कामे करण्याचा कालावधी हा 1 ऑक्टोबर ते 31 मे असा असतो. कारण उर्वरित काळात पाऊस असतो. पावसाळ्यानंतर सुरू झालेली कामे पावसाळ्याआधी पूर्ण होतात. परंतु, आता हाती घेतलेली कामे पावसाळ्याआधी पूर्ण होतील का याचा यांनी अभ्यास केला नाही. हे सर्व होत असताना कंत्राटदारांना 48 टक्के फायदा करून देण्यात आला. मुख्यमंत्र्यांना मुंबईतील कामे कशी करतात हेच माहिती नाही. महापालिकेत कोणतीही बॉडी आणि महापौर किंवा लोकप्रतिनिधी नसताना प्रशासकाने ही कामे मंजूर कशी केली? हा खूप मोठा प्रश्न आहे. टेंडरचा हा पैसा मुंबईकरांच्या खिशातील आहे. कामाची समज नसतानाही टेंडर काढण्यात आले. मुंबईतील टेंडर हे इतर राज्यांतील टेंडरपेक्षा वेगळे असते. मुंबईत सिमेंटचे रस्ते केले जात आहेत. मग गेल्या सात वर्षांपासून आताचे मुख्यमंत्री हे मंत्री होते, त्यावेळी त्यांनी ठाण्यातील रस्ते सिमेंटचे का केले नाहीत, असा प्रश्न यावेळी आदित्य टाकरे यांनी उपस्थित केला आहे.




### गेल्या सहा महिन्यात राज्यात मोघलाई

राज्यात गेल्या सहा महिन्यांपासून मोघलाई आल्यासारखे वाटत असल्याची टीका देखील आदित्य ठाकरे यांनी केली . गेल्या सहा महिन्यांपासून राज्यात मोघलाई आली आहे असे वाटते . गणपती मिरवणुकीत शिंदे गटाचे आमदार सदा सरवणकरांकडून फायरिंग करण्यात आली . आमदाराच्याच बंदुकीतून गोळी चालवण्यात आली होती . तरी देखील आतापर्यंत त्यांच्यावर कारवाई होत नाही . पोलिसांना धक्काबुक्की, शिवीगाळसारखे अनेक प्रकार राज्यात झाले आहेत . परंतु, कोणावरच कारवाई झालेली नाही . गेल्या सहा महिन्यात आम्ही सतत शेतकऱ्यांना मदत करण्याची मागणी करत आहे . परंतु, स्वत :ला खोके आणि महाराष्ट्राला धोके असे सध्या राज्यात सुरू आहे . याबरोबरच अनेकवेळा महापुरूषांचा अपमान दरून देखील राज्यपालांना वाचवण्याचा प्रयत्न केला जातोय . अशा प्रकारांच्या मागून मुंबईला आणि महाराष्ट्राला लुटण्याचा प्रकारा केला जात आहे . नागपूरच्या एनआयटी घोटाल्याबद्दल देखील आम्ही बोललो पण त्यावर कोणतीही कारवाई झालेली नाही, असा आरोप आदित्य ठाकरे यांनी केला .

# उगवतीचे रंग





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


## कवितांच्या गावा जावे...

आधुनिक केसरी

फक्त चार साधे सोपे कडवे असलेली ही कविता. जगण्याचं सार सांगून जाते. ज्याच्यात सागर पोहून जाण्याची धमक आहे, त्याला नाव मिळाली काय किंवा नाही मिळाली तरी फारसा फरक पडत नाही. कारण तो कोणावर अवलंबून नसतो. जो स्वतःच स्वतःचा दीप ( अत्तदीप भव ) झाला, त्याला प्रकाशासाठी, प्रेरणा देण्यासाठी, पुढे जाण्यासाठी परप्रकाशाची आवश्यकता नाही. 'जो करी कर्म अहेतू निरंतर...' या ओळीत तर गीतेचे सारच आले आहे. आणि शेवटच्या दोन ओळी तर अप्रतिम आहेत. ज्याला 'स्व' ची ओळख पटली त्याला देव भेटला किंवा न भेटला तरी फरक पडत नाही. परमेश्वराचे अस्तित्व सगळीकडे आहे. एक सुंदर असे सुफी वाक्य आहे, 'मी परमेश्वराला शोधू लागलो तेव्हा मला माझा शोध लागला आणि मी जेव्हा माझा शोध घेऊ लागलो तेव्हा मला परमेश्वर समजला.' पण हे केव्हा होईल ? कविवर्य बा भ बोरकरांच्या शब्दात सांगायचे तर, 'जीवन त्यांना कळले हो, मी पण ज्यांचे पक्व फळापरी सहजपणाने गळले हो...' कवितेच्या गावाबद्दल सांगण्यासारखं खूप आहे. पण आणखी कधीतरी...'



# आनंदी पहाट



## अंतर्मनाचा शास्त्रीयदृष्ट्या विचार करावा

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपल्याला दैनंदिन जीवनात निरनिराळे अनुभव येत असतात. ज्यामुळे आपली मानसिकता बदलत राहते. या बदलत जाणाऱ्या मानसिकतेच्या अनुशंगाने जरा हटके विचार करण्याची जरुरी असते. नंतरच कार्यकृती करणे योग्य ठरत असते. आपल्या अंतर्मनांत जीवनासाठी अभ्यासपूर्वक विचार होणे आवश्यक असते. ह्यात सकारात्मक

आणि विवेकी विचारांना अधिक महत्व असते. आपल्या जीवनाच्या समृद्धीसाठी आयुष्याची सुरुवातच घरामध्ये सकारात्मक विचारांनी करायची असते. कारण ह्या सर्वच बाबींचा संबंध आपल्या व्यक्त होण्यासठी असतो. मनाला रमवण्यासाठी आणि नवं आजमावण्यासाठी आपल्या अंतर्मनाचा मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यासपूर्वक विचार करावा लागतो. आपल्या मनाला नीट समजून घ्यावं लागतं. आपल्याच मनाचा अनेकदा आपल्याला अंदाज येत नाही. आपलं मन वर वर कितीही शांत वाटत असलं तरीही, काही वादळे आतल्याआत चालूच असतात, काहीवेळा अंतर्मनाला उध्वस्त करत असतात. विचारांचं थैमान सदोदित चालूच असतं, परंतू त्या विचारांना किनारा सापडत नसतो, वाट सापडत नसते. हे आपल्याला अनेकदा कळत असतं; पण वळत नसतं, हीच तर उणिव असते. मनांत येणारी प्रत्येक बाब नवीन एक प्रश्न घेऊन येत असते. उत्तर सोप्प असूनही, माहिती असूनही वेळेला सुचत नाही, कारण ते आठवत नाही. कालांतरानं परिस्थिती अशी येते कि, आपण जिंकलोय कि हरलोय तेच कळत नाही. आपल्या अंतर्मनाला पडलेल्या प्रश्नाचं उत्तर सापडलं, असं ठरवणेच कठीण होतं. निर्माण झालेल्या संभ्रमामुळे

थोडं जे काही मिळालंय ते सगळ्यांना दिसत असतं, त्यामुळे हरलोय हे मान्य करायला जग तयार नसतं आणि जे मिळालंय ते असं काही मिळालेलं असतं कि, आपण जिंकलोय हे मान्य करायला आपलं मन तयार नसतं.



आधुनिक केसरी

**आनंदाचा पूर | विठु माझा ||**
शब्द व्हावा माझा | विठ्ठलाचा भाट ||
आणिकांचा थाट | गावु नये ||१||
सत्कर्माची कास | धरावी मनाने ||
लाचारी जीवाने | करू नये ||२||
संतांची संगत | श्वास व्हावा माझा ||
जीवलग दुजा | नको मज ||३||
काळजात नांदो | सदभाव सुंदर ||
राहो निरंतर | ध्यान तुझे ||४||
अंतरी गुंजावा | अभंगाचा सूर ||
आनंदाचा पूर | विटेवरी ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# निरुपण

आधुनिक केसरी




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

**शिकणे ही एक आनंददायी प्रक्रिया असली पाहिजे, या दृष्टीने शिक्षक, मुख्याध्यापक, संचालक आणि पालक यांनी काळजी घेतली तर एकाच वेळी व्यक्ती, समाज, राष्ट्र यांचा विकास शक्य आहे.**

**निसर्गातील प्रत्येक घटक स्वतंत्र आहे. सर्व शक्तिमान आहे. त्याचे मोठेपण मात्र परस्पर पूरक असण्यात आहे.**

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

आधुनिक केसरी



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**शुद्ध बुद्ध वह पुरुष है, सब पर मुक्त स्वभाव। व्यक्ताव्यक्त से अग्र है, नाम रूप नहीं आव।।७६।। (स्वर्वेद पंचम मंडल अष्टम अध्याय) ०५/०८/७६**

**मराठी अनुवाद :** तो परम पुरुष शुद्ध, बुद्ध (ज्ञानवान), सर्वोत्कृष्ट आणि मुक्त स्वभावाचा आहे. तो व्यक्त-अव्यक्त सर्व पदार्थांहून सूक्ष्म तथा अग्रस्थानी आहे तसेच तो जगाच्या नाम रूपांमधे येत नाही.

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

# बध्दमुक्तनिरूपण

आधुनिक केसरी



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646


सहाव्या समासातील माध्यान्य भागात आपणपोहचलो आहोत. मी मागे म्हणालेच आहे की वरचेवर खुपच विचार पूर्वक लिखाण अपेक्षित आहे त्यामुळे वाचकांच्या हाती देतान ऊशीर होत आहे आणि याची मला जाणीव आहे पण ऊत्तम ते द्यावे ऊत्तम ते घ्यावे हा विचार मनात कायमचा घर करून असल्याने लिखाणात मर्यादा येत आहेत. सर्व प्रथम मी दिलगिरी व्यक्त करते. वेद वाङःमयाचा अभ्यास करत असताना अभ्यासकाने ब्रम्हा,विष्णु, महेश,दत्तात्रेय हेच फक्त थोर आणि ज्ञानी पुरूष होऊन गेले असे म्हणणे म्हणजे पढतमूर्ख पणा आहे. आणि यावर आपण एक समास पूर्णपणे अभ्यासला आहे.( पढतमूर्खाची लक्षणे ) वेद,उपनिषदांमध्ये भागवत ग्रंथात ऊल्लेखलेला शुक आणि वामदेव यांचा देखील मुक्त व ज्ञानी असा ऊल्लेख आढळतो. हे दोघेही ब्रम्हज्ञानी होते. या समासात समर्थानी सांगितले आहे की वेदाने पूर्व पक्ष मांडला. त्यांच्या अंगी ब्रम्हज्ञान  करून देऊन जीवाला मुक्त करण्याचे सामर्थ्य नसेल तर त्याला कोणीही विचारणार नाही. जीवाला मुक्त  करण्याचे सामर्थ्य वेदांच्या ठिकाणी आहे यांत शंकाच नाही. महापुण्य पदरी असेल तरचं वेदांचा अभ्यास होईल असे 30व्या ओवीत प्रत्यक्ष समर्थ आपल्याला सांगतात. पूढे असेही म्हणले आहे की एक पूर्ण श्लोक किंवा अर्धा श्लोक किंवा त्यातील एक भाग किंवा नुसता एक शब्द जरी मनापासून श्रवण केला तर अनेक दोष नाहींसे होतील. वेद,पुराण,शास्त्र यांचा श्रवणभक्तिने सुध्दख माणुस पवित्र बनून जातो. व्यासांनी भागवत ग्रंथात हेही सांगितले आहे.  मुक्त व ज्ञानी पुरूष देहाने जगात वावरत असताना आपली ब्रम्हाकारता ढळूं देत नाहीत.

# नाम व भगवंत

आधुनिक केसरी

राम राम ' म्हणून राम कसा भेटेल या विचारण्यात काहीच अर्थ नाही. उलट असे म्हणता येईल की, 'राम राम' म्हटल्याशिवाय राम भेटणेच शक्य नाही. व्यवहारातही आपला हाच अनुभव आहे. समजा, आपल्याला एका गावाला जायचे आहे म्हणून आपण स्टेशनवर गेलो, आणि जिथे जायचे आहे त्याचे सर्व वर्णन केले पण नाव सांगता आले नाही, तर आपल्याला तिकीट मिळेल का ? उलट, त्या गावातली काही माहिती नाही पण नाव ठाऊक आहे, तर आपल्याला तिकीट मिळून तिथे जाता येईल. म्हणजे, ठिकाण माहितीचे आहे पण नाव तेवढेच न आठवले तर काहीही उपयोग होत नाही. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते की, बाकी सर्व केले पण नाम नाही घेतले तर काही उपयोग होत नाही; म्हणून नाम घेणेच जरूर आहे. नामाने भगवंताची प्राप्ती होणार ही खात्री असावी.

भगवंताच्या नामाची गरज दोन तऱ्हेने आहे : एक, प्रपंचाचे स्वरूप कळण्यासाठी, आणि दुसरी, भगवंताच्या प्राप्तीसाठी. खायला-प्यायला पोटभर, बायकोमुले, घरदार, वगैरे सर्व गोष्टी असल्या तरीसुद्धा आपल्याला काळजी आणि तळमळ का असते हे आपल्याला कळत नाही. याचा अर्थ, दुःखाचे खरे स्थान कुठे आहे हे कळत नाही. ते कळण्याकरिता भगवंताच्या नामाची गरज आहे. भगवंताची तळमळ



लागेपर्यंत नामाची जरुरी आहे; नंतर, भगवंतावाचून आपल्याला दुसरा आधार नाही म्हणून नाम घ्यायला पाहिजे; आणि शेवटी, भगवंताच्या दर्शनानंतर नाम सवयीने आपोआप येते. एकूण, आरंभापासून शेवटपर्यंत भगवंताचे नामच शिल्लक राहते. जो नामस्मरण करील आणि त्याचे अनुसंधान ठेवील त्याला भगवंताची जिज्ञासा आपोआप उत्पन्न होईल. नामाकरिता नाम घ्या, की त्यात राम आहे हे कळेल. नाम घेताना, जे घडेल ते चांगले आणि आपल्या कल्याणाचे आहे असा भरवसा ठेवा. भगवंताचे नाम हीच सच्चिदानंदस्वरूप सद्वस्तू होय. भगवंताच्या नामात जो स्वतःला विसरला तो खरा जीवन्मुक्त होय. जे काय साधायचे ते हेच. बाकीच्या गोष्टी स्वप्नासारख्या समजाव्यात. त्या प्रचीतीस येतात पण नसतात. देहाशी असलेले आपले तादात्म्य हे एक प्रकारच्या सवयीने आणि अभ्यासानेच झालेले आहे. याच्या उलट अभ्यास करून भगवंताचे चिंतन केले तर जसे आज देहाशी तादात्म्य आहे त्याचप्रमाणे भगवंताशी आपले तादात्म्य होईल. **आजचे बोधवचन आहे** – सकाळी उठताना, रात्री निजताना, जेवायच्या आधी, नाम घ्यायचेच आणि भगवंताची आठवण करायचीच असा नियम करावा. तो आयुष्यात फार उपयोगी पडेल. श्रीराम समर्थ

# हरिपाठ

आधुनिक केसरी

माऊली म्हणतात, तू सतत हरिचे नाम घे. त्याची गणना करू नकोस. मनुष्याला जिवंत राहण्यासाठी श्वसन करावे लागते. मग मनुष्य असे म्हणत नाही की आज मी फक्त पाचवेळाच श्वसन करेन, मला कंटाळा येतो, सारखे श्वसन करण्याचा. तद्वतच मनुष्याने सतत नामस्मरण करावे, हरिचे नाम घ्यावे असे माऊली आपल्याला सांगतात.

# कन्नड येथे वैभव तोंडे यांनी पकडला काळ्या बाजारात जाणारा 300 क्विंटल तांदळाचा ट्रक

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** बाजारात तांदुळ चढ्या भावाने काळ्या बाजारात विक्री करण्यासाठी कर्नाटक येथून ट्रक क्रमांक जी.जे. 25 यु. 9521 गुजरात येथे घेवून जात असतांना हतनूर टोल नाका येथे पुरवठा निरीक्षक वैभव तोंडे यांना गोपनिय माहीती मिळताच सदरील ट्रक थांबवून ट्रक मधील मालाबाबत विचारणा केली असता चालक बालुभाई आलाभाई मोरी वय 30 रा. राणावाव जि.पोरबंदर राज्य गुजरात यांनी कर्नाटक येथील तिरुपती ट्रेंडर्स बिदर येथून 30 टन तांदुळ गुजरात येथे घेवून जात असले बाबत सांगितले. सदरील तांदुळ बाबत संशय आल्याने गाडीमधील काही गोण्याची पाहणी केली असता काही गोण्या मध्ये मध्यप्रदेश येथील सार्वजनिक धान्य वितरण व्यवस्थेचा मार्क प्रिंट असलेल्या तांदुळ मिळुन आला. ट्रकमधील तांदुळ हे सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील आहे याची खात्री झाल्याने संपूर्ण ट्रकची पाहणी केली असता त्यामध्ये खालीलप्रमाणे माल मिळुन आला.
पांढऱ्या रंगाचे प्लास्टिकच्या गोण्यामध्ये रु.6.20,000/- किंमतीचा तांदुळ प्रति गोणी 50 किलो प्रमाणे एकुण 620 गोण्या



अंदाजे वजन 300 क्विंटल एक टाटा कंपनीचा 14 टायर लाल रंगाचा रु 30,00000/- किंमतीचा ट्रक एकुण रु 36,20000 /- मुद्देमाल जप्त करण्यात आला असून ट्रकचालक चालक बालुभाई आलाभाई मोरी व बिदर कर्नाटक येथील तिरुपती ट्रेंडर्स चे मालक यांचेविरुद्ध जीवनावश्यक वस्तू अधिनियम कायदा प्रमाणे कलम 3 व 7 अंतर्गत गुन्हा नोंद होण्यासाठी पोलीस ठाणे कन्नड (ग्रामीण ) येथे कायदेशीर फिर्याद दिली आहे. सदरील कार्यवाही आस्तिक कुमार पाण्डेय जिल्हाधिकारी औरंगाबाद , यांच्या मार्गदर्शनाखाली वर्षाराणी भोसले जिल्हापुरवठा अधिकारी औरंगाबाद यांच्या निर्देशानुसार, जनार्दन विधाते मा.उप विभागीय अधिकारी कन्नड व संजय वारकड तहसिलदार कन्नड यांचे प्रमुख मार्गदर्शनाखाली पुरवठा निरीक्षक अधिकारी शेख हरून व वैभव तोंडे पुरवठा निरीक्षक कन्नड यांनी केली असून . ग्रामीण पोलीस स्टेशन कन्नड येथे गुन्हा रजिस्टर नंबर 007/2023 अन्वय जीवनावश्यक वस्तू कायदा 1955 चे कलम 3 व 7 अन्वय संबंधितावर गुन्हा रात्री उशिरा दाखल केला आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास तात्येराव भालेराव सहाय्यक पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे कन्नड (ग्रामीण ) करीत आहेत.

## पुण्याचे नाव जिजाऊनगर करा; अमोल मिटकरी

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** अहमदनगरच्या नामांतराचा मुद्दा चांगलाच गाजला होता. या शहराचे नाव अहिल्यानगर करा अशी मागणी केली जात आहे. असे असतानाच आता पुण्याचे नाव बादलण्याची मागणी जोर धरू लागली आहे. राष्ट्रवादीचे नेते तथा आमदार अमोल मिटकरी यांनी पुणे शहराचे नाव जिजाऊ नगर करावे, अशी मागणी केली आहे. तर या नावास हिंदू महासंघाने विरोध केला आहे. त्यामुळे पुणे शहर नामांतराच्या मुद्द्यावरून वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. राष्ट्रवादीचे नेते तथा आमदार अमोल मिटकरी यांनी पुणे शहराला जिजाऊ नगर असे नाव द्यावे, अशी मागणी केली आहे. त्यांनी याबावत एक ट्वीटही केले आहे. "पुणे शहराचे नामकरण जिजाऊ नगर व्हावे ही महाराष्ट्रातील तमाम शिवभक्तांची इच्छा आहे. येणाऱ्या अधिवेशनात याबाबत सरकारकडे मागणी करणार, असे अमोल मिटकरी आपल्या ट्वीटमध्ये म्हणाले आहेत. तर पुणे शहराचे नाव जिजाऊ नगर करण्यास हिंदू महासंघाने विरोध केले आहे. "जिजाऊमाता देशातील सर्व हिंदुत्ववाद्यांना आणि शिवभक्तांना वंदणीय आहेत. मात्र पुणे शहराला त्यांचे नाव देणे उचित होणार नाही, असे आमचे मत आहे. स्वतः छत्रपती शिवाजी महाराज यांनीदेखील या शहराचे नाव बदलले नव्हते. त्याऐवजी राजमाता जिजाऊ यांचे लाल महाल येथे स्मारक उभारण्यात यावे.





## शिवसेना- वंचितच्यावतीने विद्यार्थ्यांना बिस्कीट, फळवाटप

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** तालुक्यातील लासूर स्टेशन येथील जिल्हा परिषद शाळेची शैक्षणिक सहल दौलताबाद, खुलताबाद, औरंगाबाद याठिकाणी उद्या शनिवारी जात आहे. त्यामुळे सहलीत्या जाणार 80 शालेय विद्यार्थ्यांना बिस्कीट, फळ, व पिण्याच्या पाण्याचे वाटप करण्यात आले यावेळी जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांना माजी सभापती तथा शिवसेनेचे उपतालुकाप्रमुख संजय जयस्वाल, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा सचिव संदीप गायकवाड, मा. ग्रामपंचायत सदस्य नारायण ठोळे, प्रतीक खंडेलवाल,गोविंद शेलार, अक्षय चव्हाण, शुभम वरकड,मस्के सर नरोडे सर कुलकर्णी सर, तुपे सर, महबूब खेडा येथील शिक्षक वृंद शिक्षकेतर कर्मचारी आदिसह गावकरी विद्यार्थी उपस्थित होते.

## भ्रष्टाचारी ठेकेदाराचा निकृष्ट रस्ते कामांची पोलखोल

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** राज्य शासनाने दिलेल्या 30 कोटी रुपयांच्या निधीतून धुळे शहरातील देवपुरातील रस्त्यांची कामे केली जात आहेत. मात्र सत्ताधारी भाजपचे नगरसेवक व ठेकेदार यांच्या संगणमताने ही कामे अतिशय निकृष्ट दर्जाची केली जात आहेत. याविरोधात धुळे महानगर शिवसेना ठाकरे गटाच्या वतीने या निकृष्ट कामाचा पोलखोल करण्याचाआक्रमक पवित्रा घेतला आहे. आज सलग चौथ्या दिवशी धुळे शहरातील देवपूर भागातील प्रभाग क्रमांक 2 हजारे कॉलनीतील नुकताच केलेला डांबरी रस्ता पूर्णपणे निकृष्ट पद्धतीने केला गेला आहे. सत्ताधारी भाजपाचे नगरसेवक व ठेकेदार यांच्या संगनमताने अक्षरशा मातीवर निकृष्ट डांबरी कार्पेट करून रस्ते तयार केले गेले आहेत. त्यामुळे रस्ते अक्षरशः हातानेच उखडत आहेत. शिवसेना ठाकरे गटाने या रस्त्यांच्या कामांवर



जाऊन आंदोलन करून भ्रष्ट महानगरपालिका प्रशासन, सत्ताधारी भाजपचे नगरसेवक व ठेकेदार यांचा निषेध करत धुळे महानगरपालिकेचा भ्रष्ट कारभार चव्हाट्यावर अनात आहे. हाताने उघडलेला रस्त्याचे डांबर थेट धुळे महानगरपालिकेचे सहाय्यक आयुक्त व बांधकाम अभियंता यांच्या दालनात आणून संबंधित दोषी नगरसेवक, ठेकेदार यांच्या विरोधात कारवाईची मागणी केली आहे. यामुळे धुळे मनपाचे सत्ताधारी भाजप विरुद्ध शिवसेना ठाकरे गट यांच्यातील संघर्ष शिगेला पोहोचला आहे.

## अर्णव लीलाधर वाढईची राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक संचलनाकरिता निवड

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** कांचनवाडी येथील छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था संचलित आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय या महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक (NSS VOLUNTEER) व द्वितीय वर्ष विद्यार्थी अर्णव लीलाधर वाढई याची महाराष्ट्र राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन पथसंचलन 2023 मध्ये राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक संचलन (परेड) करिता निवड झाली आहे. तसेच राष्ट्रीय स्तरावरील पथसंचलनात त्याची प्रतिक्षायादीत निवडही झाली आहे. हे पथसंचलन दिनांक 26 जानेवारी 2023 रोजी शिवाजी पार्क, दादर, मुंबई येथे होणार आहे. शारीरिक व मानसिक क्षमता जेथे कसून तपासली जाते असे निवड प्रक्रियेचे तीन टप्पे या स्वयंसेवकाने यशस्वीरित्या पूर्ण केले आहेत. अर्णवचे शालेय शिक्षण सैनिकी शाळेत झाले आहे. पथसंचलन पूर्व निवड चाचणीसाठी संस्थेचे अध्यक्ष श्री. रणजीत मुळे, सचिव श्री. पद्माकरराव मुळे, महाविद्यालयाचे प्राचार्य व संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुख व शैक्षणिक विभाग प्रमुख डॉ. जयश्री देशमुख यांनी प्रेरणा, मार्गदर्शन व सहकार्य मिळाले. निवड प्रक्रियेच्या तयारीसाठी महाविद्यालयाचे क्रीडा प्रशिक्षक, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी, राजे संभाजी भोसले सैनिकी शाळेतील प्रशिक्षक व डिफेन्स करिअर अकॅडमी येथील प्रशिक्षकांनी मदत केली.



निवड प्रक्रियेच्या प्रत्येक पायरीवर महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरू लेफ्टनंट जनरल डॉ. माधुरी कानिटकर, प्रति कुलगुरू डॉ. मिलिंद निकुंभ व विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक व राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. मनोजकुमार मोरे यांनी वेळोवेळी स्वयंसेवकांना प्रोत्साहन दिले व अभिनंदन केले. राष्ट्रीय सेवा योजना राज्य संपर्क अधिकारी / विशेष कार्य अधिकारी, महाराष्ट्र शासन, डॉ. प्रशांतकुमार वनंजे यांनी स्वयंसेवकांना शुभेच्छा दिल्या आहेत.

# सत्तेची पुंगी निकामी झाल्याने महाविकास आघाडीची तिघाडी बिघडली!

## भाजपा मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांची टीका

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** सत्तेची संधी दिसल्यामुळे एकत्र आलेल्या शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसची महाविकास आघाडी ही केवळ गाजराची पुंगी होती हे आता स्पष्ट झाले आहे. सत्ता जाताच या आघाडीची बिघाडी झाली असून एकत्र राहिल्यास तीन तिघाडा काम बिघाडा होईल याची त्यांना खात्री असल्यामुळेच विधान परिषदेच्या निवडणुकीत तिघांची तोंडे तीन दिशांना असल्याचे दिसू लागले आहे. महाविकास आघाडी म्हणून सत्ता राबवितानाही एकमेकांवर कुरघोडी करणाऱ्या नेत्यांना आता आपापल्या पक्षाचा बचाव कसा करायचा या चिंतेने ग्रासले असून ही आघाडी म्हणजे महाराष्ट्राला लागलेले ग्रहण होते, अशी खरमरीत टीका प्रदेश भाजपाचे मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी शुक्रवारी केली. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. प्रदेश प्रवक्ते गणेश हाके , शिवानंद हैबतपुरे यावेळी उपस्थित होते.

भाजपा प्रदेश मुख्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत बोलताना ते म्हणाले की, सत्ता गेल्यानंतरही एकत्र राहण्याच्या गर्जना करणारे महाविकास आघाडीतील तीन पक्ष विधान परिषदेच्या पाच जागांसाठी होणाऱ्या निवडणुकीतही एकत्र राहू शकत नाहीत, यावरूनच त्यांच्या ऐक्याच्या गर्जना केवळ पोकळ होत्या हे उघड झाले आहे. बंडखोरी, नाराजी आणि फुटीने ग्रासलेल्या काँग्रेसकडे उमेदवार नाहीत. पक्षातील नाराजीमुळे काँग्रेसची अवस्था केविलवाणी झाली आहे, तर राष्ट्रवादीला भ्रष्टाचाराने ग्रासले आहे. उद्धव ठाकरे यांची शिल्लक सेना महाविकास आघाडीत एकाकी झाली असून काँग्रेस-राष्ट्रवादीकडून या पक्षाच्या अस्तित्वाची दखलही घेतली जात नसल्याने ठाकरे गटाची अवस्था केविलवाणी झाली आहे. अशा तिघाडी स्थितीतील ही आघाडी पाच जागांकरितादेखील उमेदवार देऊ शकत नसल्याने आघाडीचे अस्तित्व संपले आहे. नाशिक पदवीधर मतदारसंघात महाविकास आघाडीकडे उमेदवारच नाही, तर अमरावती पदवीधर मतदारसंघातून लढण्याआधीच काँग्रेसने माघार घेतली आहे. नागपूरमध्ये तीनही पक्षांचे उमेदवार उभे करून महाविकास आघाडीने स्वतःच आपल्या तिघाडीचा गाशा गुंडाळला आहे, असे उपाध्ये म्हणाले. महाविकास आघाडी ही राजकीय तडजोड म्हणून जन्माला आलेली व उद्धव ठाकरेंच्या विश्वासघातकी महत्वाकांक्षेने खतपाणी घालून शिवसेनेची शकले करण्यासाठी आयोजित केलेली शक्कल होती हे आता स्पष्ट झाल्याने या आघाडीचे अस्तित्व संपले आहे, असे उपाध्ये यांनी सांगितले.

# चंद्रशेखर रावांचा हल्लाबोल

आधुनिक केसरी

भारत राष्ट्र समितीचे ( पूर्वी तेलंगणा राष्ट्र समिती ) सर्वेसर्वा आणि तेलंगणाचे मुख्यमंत्री के चंद्रशेखर राव २०२४ साली होणाऱ्या लोकसभेसाठी तयारी करत आहेत. त्यासाठी केसीआर हे तिसऱ्या आघाडीची मोट बांधत आहेत. अशातच आता केसीआर यांनी भाजपावर अप्रत्यक्षपणे हल्लाबोल केला आहे. धार्मिक आणि जातीय कट्टरतेला प्रोत्साहन दिल्यास समाजात उभी फूट पडून नरक बनेल. तसेच, भारतात अफगाणिस्तानप्रमाणे तालिबानसारखी परिस्थिती निर्माण होईल. त्यामुळे तरुणांनी सतर्क रहावे, असा सल्ला केसीआर यांनी दिला आहे. महबूबाबाद आणि कोठागुडेम येथील जिल्हाधिकारी कार्यालयाचे मुख्यमंत्री केसीआर यांनी उद्घाटन केले. त्यानंतर संबोधित करताना केसीआर म्हणाले, “केंद्रात पुरोगामी विचारांचे आणि निप:क्षपाती सरकार असेल तर देश, राज्य प्रगती करू शकेल. केंद्राने राज्य सरकारला मदत न केल्याने तेलंगणाचे सकल उत्पादन ( जीडीपी ) वाढले नाही, असा आरोप केसीआर यांनी केला. तेलंगणाची निर्मिती २०१४ साली झाली, तेव्हा राज्याचा जीएसडीपी ५ लाख कोटी रुपये होता. तो सध्या १४.५० लाख कोटी असायला हवा होता. पण, आता ११.५ लाख कोटी राज्याचा जीएसडीपी आहे. केंद्राच्या अकार्यक्षम धोरणांमुळे तेलंगणाला ३ लाख कोटी रुपयांचे नुकसान झालं आहे. ही आकडेवारी अर्थतज्ज्ञ, आरबीआय आणि कॅगने दिली, असा दावा केसीआर यांनी केला. देशाची अवस्था तालिबानसारखी झाली, तर गुंतवणूक येईल का? नोकऱ्या मिळतील का? सध्याचे उद्योगधंदे राहतील का? देशात अशांतता निर्माण होत, लाठीचार्ज आणि गोळीबारसारखे वातावरण निर्माण झाले, तर समाज कसा राहणार? देशाला चुकीच्या मार्गावर नेण्याचे प्रयत्न होत आहेत, असेही केसीआर यांनी सांगितले. देशात पाणी आणि विजेची संसाधने उपलब्ध आहेत. तरी, केंद्राच्या चुकीच्या धोरणांमुळे राज्या-राज्यात पाण्यावरून वाद सुरु आहे. दिल्लीतही पिण्याचे पाणी आणि विजेचा पुरवठा सुरळीत होत नाही, हे लज्जास्पद आहे, असे असतानाही मोठी-मोठी भाषणे केली जातात, असा टोला केसीआर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना अप्रत्यक्षपणे लगावला.



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

# नामांतर लढा, एकिकरणाचा धडा

आधुनिक केसरी

**चौदा जानेवारी हा दिवस म्हणजे आंबेडकरवादी चळवळी साठी त्याग, समर्पण, बलिदान, एकी आणि आदर्श संघटनेमधुन निर्माण झालेला स्वाभिमान व स्वाभिमानासाठी पेटलेल्या शहिद व वेगवेगळ्या राजकीय नेते कार्यकर्ते सामाजिक संघटना थोडक्यात जे कोणी आंबेडकरवादी आहे त्यांच्या लढ्याचा विजय दिवस होय. मराठवाडा विद्यापिठाला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव मिळावे म्हणून सभागृहात ठराव पास होऊनही धर्मांध व जातीची घाण डोक्यात असलेल्या लोकांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाला जातीचे स्वरूप दिले आणि विरोध दर्शविला.**

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे आणि औरंगाबाद चे जवळचे संबध, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालय सुरू करून बहुजन विद्यार्थ्यांना शिक्षणाची द्वारे उघडी करून त्यांना सर्वांगीण विकासाची संधी निर्माण करून दिली.

डॉक्टर बाबासाहेब यांच्या मुळे औरंगाबाद मधीलच नव्हे देशातील करोडो बहुजनां शिक्षण, संरक्षण, आरक्षण,स्वातंत्र्य आणि हक्क अधिकार मिळाले आणि बहुजन समाजात शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक क्रांती झाली. अशा थोर महापुषांचे नाव एका जातीशी जोडून त्यांना मर्यादित करण्याचा प्रयत्न त्यामुळे अनेक राजकीय, सामाजिक नेते काही संघटना यांच्या कडून झाला. परंतु डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या त्याग समर्पणामुळे आमचे अस्तीत्व आहे याची जाणीव असणाऱ्या बहुजन समजातील आंबेडकरवादी नेते कार्यकर्ते आणि विद्यार्थी यांनी विद्यापिठाला नाव मिळालेच पाहिजे याचा आग्रह धरला आणि तेथून खरा लढा सुरू झाला तो आणि सतत तो लढा वाढत गेला. इतिहासाने मराठवाडा विद्यापिठा नामांतर लढा जो आहे तसा लढा कदाचित बघितला नसेल. म्हणून नामांतर लढा हा बहुजन समाजातील आंबेडकरवादी समाजासाठी अस्मीता व स्वाभिमान म्हणून खुप महत्वाचा आहे. १९७८ ला सुरू झालेला लढा १४ जानेवारी १९९४ ला शमला आणि नामविस्ताराच्या माध्यमातून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे नाव विद्यापिठाच्या पटलावर आले. १९७८ ते १९९४ हा काळ आंबेडकरवादी समुदायासाठी खुप महत्वाचा काळ होता १९७८ पासुन १९९४ पर्यंत चा काळ बघितला तर या समाजाचे खूप काही घमावले आहे. परंतु सोळा सतरा वर्षात जे काही गमावले ते फक्त एका नावामुळे विसरून गेले, गमावलेल्या गोष्टींचे चिज झाले ते फक्त एका नावाने. नाव विद्यापिठाला मिळाले आणि आंबेडकरवादी समाजाच्या जखमा भरून आल्या सारखे झाले. ज्या महापुरुषाने आयुष्य भर जातीअंता साठी लढा दिला त्याच महापुरुषाला जातीत बंद करून नावाला विरोध म्हणजे बौद्धीक अपंगत्वाचे व जातिय द्वेषाचे उदाहरणे होते.

विद्यापिठाचे नामांतर व्हावे म्हणून म्हणून जो सोळा सतरा वर्षाचा काळ होता तो काळ खूप वेदना दायक होता कारण नामांतर लढ्याने हिंसक वळण घेतले. नामांतर विरोधी व नामांतर समर्थक समोरा समोर येत होते. सोळा वर्षामध्ये अनेक घरे समाजकंटकांनी जाळून टाकली, नामांतर लढ्यामुळे आंबेडकरवादी समाजावर बहिष्कार टाकला, सार्वजनिक ठिकाण, गावातील मुलभूत सुविधेपासुन दुर ठेवण्यात आले. महिलांवर अत्याचार केल्या गेले विद्यार्थांवर अत्याचार केले गेले. आंदोलनावर दगडफेक, लाठीहल्ला अशा प्रकारचे हिंसक कृत्य एक दोन दिवस नव्हे तब्बल पंधरा वर्षापेक्षा जास्त काळ चालले. थोडा तरी विचार केला तर खरचं अंगावर काटा येतो, डोळ्यातून अश्रू येतात. येथील स्त्रियांना पाणी, दैनंदिन जगण्यासाठी वस्तु मिळत नव्हत्या गावामध्ये काम मिळत नसे पाणी नाही मिळाले तरी चालते हाताला काम नसेल




तरीही चालते पण विद्यापिठाला नाव पाहिजे कारण वर्षानुवर्षे जे मृत अवस्थेत होते त्यांच्या शरीरात प्राण ओतण्याचे काम डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी केले आणि त्याची जाणीव समाजाला होती. घरे जाळली जात होत महिलांवरील अत्याचार वाढले होते तरही विद्यार्थी संघटना, नेते महिला खचुन गेल्या नाही. अनेक महिला नुकतेच जन्माला आलेले बाळ घेऊन नामांतर लढ्यात सहभागी झाले कारण लढा फक्त नावाचा नव्हता तर स्वाभिमानाचा होता. एवढे सारे होऊनही कुणीच डगमगले नाही कुणीच माघार घेतली नाही कारण तेव्हा ताकद निर्माण झाली होती ती एकीची. या लढ्यामध्ये नेतृत्वासाठी वाद नव्हते, कोणी लहान कोणी मोठे नव्हते, मीच करणार किंवा माझ्याच मुळे होणार अंहकार नव्हता, मला काही मिळेल हा स्वार्थ नव्हता म्हणून अनेक नेते कार्यकर्ते यांनी लढ्यामध्ये लाठीहल्ला सहन केला, तुरुंगवास भोगला पण खचले नाही किंवा त्यावेळी श्रेय स्वतः कडे घेतले नाही. प्रत्येक जन एक सामान्य कार्यकर्ता म्हणून आपापल्या परिने नामांतर लढा लढत होते. अनेक विद्यार्थ्यांना या मध्ये स्वतः चा जिव गमवावा लागला. काही तरुणांनी आत्मदहण करून सरकार आपले बलिदान दिले. नामांतर लढ्यात जे शहिद झाले ते शहिदांचे योगदान व जे कार्यकर्ते नेते यांनी योगदान दिले त्यांचे कार्य, योगदान, त्याग हे विसरता येत नाही आणि त्याची तुलना करता येत नाही एवढे ते त्या त्या ठिकाणी योग्य होते. एकिकरणाच्या माध्यमातून सतत सोळा वर्षे लढा देऊन इतिहासाला सुद्धा दया आली असेल परंतु येथील कर्मठ लोकांना दया येत नव्हती. कोणी दयामाया करावा म्हणून लढाही नव्हता. परंतु आंबेडरकवादी समुहाने हे सगळं सहन केले आणि त्यांच्या कार्याला, त्यागाला यश मिळाले यातच धन्यता मानली.

सतत सोळा सतरा वर्षे लढा अविरत पणे सुरू राहीला तो फक्त एकीमुळे संघटीत समुहामुळे फक्त एका मुद्यावर लोक संघटीत झाले आणि एक नव्हे दोन नव्हे सतत सोळा वर्ष संघर्ष केला आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी जो संदेश दिला होता तो खऱ्या अर्थाने सार्धक होत होता. कारण या लढ्यामध्ये शिकलेले आणि शिकणारे तरुण होते, सर्वजन एकामुद्यावर संघटीत झाले होते कोणताही वैद्यक्तीक भेद वा वाद नव्हता आणि संघर्ष तर संघर्षाला लाजवेल असा संघर्ष केला आणि जातीवादी, विषमतावादी, कर्मठ लोकांच्या मनात धास्ती भरली मनोमन ते लोक हरले होते परंतु सत्तेचा दुरुपयोग करून येथील समाजाला दाबण्याचा प्रयत्न केला परंतु डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिका संघटीत व्हा आणि संघर्ष करा या संदेशाने पेटून उठलेल्या जनसमुदायाने आपला विजय निश्चितच केला नाही तर याच एकीने महाराष्ट्राला खासदार, आमदार, मंत्री देऊन राजकीय वजन देखील वाढवले. आंबेडकरवादी समुदायाचे प्रश्न मांडुन त्यांच्या हक्क अधिकारासाठी आवाज उठणारे लोक सभागृहात होते म्हणून समजाला राजकीय संरक्षण सुद्धां या एकिकरणा मुळे व संघटीत झाल्यामुळे मिळाले व त्या वेळी अनेक प्रश्नही निकाली काढल्या गेले, आंबेडकरवादी समाजाचे हित लक्षात घेतले गेले हे कोणी नाकारू शकत नाही. त्याच लढ्यातील शहीद विरांना मानवंदना देण्यासाठी, एकीकरणाची व संघर्षाची महती बघण्यासाठी लाखो लोक १४ जानेवारी ला विद्यापीठ गेटवर येतात शहीदांना व विद्यापिठ गेटला मानवंदना देऊन आम्ही आजही त्यांचे सामाजिक कर्जदार आहोत याचे भाण ठेवून नतमस्तक होतात, त्यांचे कर्ज आज फिटू शकत नाही परंतु आम्ही तुम्हाला विसरू शकत नाही याची जाणीव ठेवून खेडोपाडी राहणाऱ्या वयस्कर महीला, लहान थोर समुदाय लाखोंच्या संख्येने येतो. मानवंदना देतो पण खंत आहे जाताना घरी काय घेऊन जातो ? आज कोणी मान्य करेल किंवा करणार नाही परंतु वास्तविकता आहे आंबेडकरवादी समाजाचे राजकारणात वजन राहीले नाही याचे कारण एकच आहे ते म्हणजे आज आंबेडकरवादी नेत्यांमध्ये कार्यकर्त्यांमध्ये एकी नाही. एकिने मिळवलेला विजय १४ जानेवारी ला धुमधडाक्यात साजरा होतो परंतु हा साजरा करताना बेकीचे विचारपिठ दिसतात, जो जो स्वतः ला श्रेष्ठ ठरवून स्वतः ची महती सांगण्यात व्यस्त असतो परंतु याच मुळे आंबेडकरवादी आमदार खासदार आज सभागृहात नाहीत यांची खंत कुणाला वाटत नाही. वेगवेगळे स्टेज तयार करून बेकी दाखवताना सुद्धां काहीच वाटत नाही. स्वतः ला खरे आंबेडकरवादी समजणाऱ्या कार्यकर्ते व नेते यांनी किमान १४ जानेवारी ला तरी सर्वांनी एकाच स्टेजवर येऊन एकी व संघर्षावर बोलावे, एकत्र येऊन मानवंदना द्यावी यातुन समाजात चांगला संदेश जाईल आणि स्वतः चे लेबल लाऊन स्वतः चे स्टेज थाटून त्यावरून भाषने देण्यासाठी महोत्सव काय राजकीय नाही. म्हणून नामविस्तार दिन साजरा करताना आंबेडकरवादी नेते कार्यकर्ते यांनी एका दिवसासाठी का होईना एकत्र यावे एक स्टेज एक विचार द्यावा आणि हिच खरी मानवंदना नामांतर लढ्यात शहिद झालेल्या शहीदांना राहील. आणि पुन्हा एकीकरणाचा धडा घेऊन लोक परत जातील आणि पुन्हा परिवर्तनाला कुठे सुरवात होईल..



# शांतीदूत : श्री श्री रविशंकर

आधुनिक केसरी

**श्री श्री रविशंकर यांनी जागतिक स्तरावर शांतता चर्चेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. भारतातील काश्मीर, आसाम आणि बिहार पासून ते कोलंबिया, कोसोव्हो, इराक आणि सीरिया ते कोटे दि आल्वोर पर्यंत श्री श्रींच्या विविध तणाव मुक्तीच्या प्रोग्रॅमचा जनमानसावर लक्षणीय परिणाम होऊन ते सशस्त्र संघर्षाकडून शांतीच्या मार्गाकडे परतत आहेत. जेंव्हा जगवाढणारी हिंसा आणि संघर्षाने वेढलेले असतांना श्री श्रीं लोकांना दुसरा मार्ग दाखवतात ज्यामुळे लोंकाना आंतरिक शांती प्राप्त होते आणि त्या व्यक्तीमध्ये आपुलकी, शांती आणि एकोप्याची भावना वाढीस लागते.**

राष्ट्रीय-सामुदायिक पातळीवर, गरुदेव श्री श्रीं च्या कार्यक्रमांनी मुख्य सामाजिक समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला आहे. जसे, अमेरिकेमध्ये युवक नेतृत्व शिबिरे तेथील शहरे आणि शाळांमधील सामुहिक हिंसा, अमली पदार्थ आणि व्यसन या सामाजिक समस्या हाताळण्यास मदत करत आहेत. सुप्रसिद्ध असा प्रोजेक्ट वेलकम होम ट्रूप्स मुळे मायदेशी परतलेल्या सैनिकांचे जीवन आघात निवारण प्रोग्रॅममुळे अमुलाग्र बदलून गेले आणि या बाबतचे माहितीपट तयार आहेत. भारतात, श्री श्री २००१-०२ मध्ये आणि २०१७ पासून पुन्हा अयोध्या संघर्षाचा शांततेने तोडगा काढण्यात गुंतले होते. त्यांच्या या प्रयत्नांना मान्यता म्हणून सुप्रीम कोर्टाने तो संघर्ष सोडविण्यासाठी त्यांना तीन मध्यस्थांपैकी एक म्हणून नेमले. 500 वर्षाचा जुना मुद्दा अखेर 2019 मध्ये संपुष्टात आला. लॅटिन अमेरिकन देशात चालू असलेल्या सामाजिक आणि राजकीय पेचप्रसंगाचा शांततेत अंत करण्यासाठी व्हेनेझुएलामधील सत्ताधारी आणि विरोधी नेते यांच्यात एक समान आधार/ मुद्दा शोधण्याचे ते काम करत आहेत. सामाजिक जीवनातील नीतीमूल्यांच्या पुनर्रुजीवनासाठी श्री श्रींनी इंडिया अगेन्स्ट करप्शन आणि वर्ल्ड फोरम फॉर एथिक्स इन बिसनेस सारख्या मोहिमा पुढाकाराने सुरु केल्या आणि त्यांचे समर्थन केले. गरुदेव श्री श्रीं नी सुरु केलेल्या ७०२ शाळा भारतामधील दुर्गम आणि आदिवासी भागामध्ये ७०,००० विद्यार्थ्यांना मोफत आणि अद्यावत शिक्षणाची सोय करून त्यांना जबाबदार नागरिक बनवत आहेत. गरुदेव श्री श्रीं च्या नेतृत्वा खाली पर्यावरणाची निगा हा आपल्या संस्थेद्वारे सुरु केलेला सर्वात मोठा प्रकल्प आहे. याअंतर्गत ४७ नद्या आणि हजारो जलाशयांचे पुनर्रुजीवन सुरु आहे. आर्ट ऑफ लिविंगच्या स्वयंसेवकांनी ३६ देशामध्ये आणि २७ भारतीय राज्यांमध्ये ८.१ कोटी वृक्ष लावले आहेत. आर्ट ऑफ लिव्हिंग तुरुंगातील प्रोग्रॅम (प्रीजन प्रोग्रॅम) कैद्यांना पुनर्वसनासाठी मदत करतो. जागतिक स्तरावर ८,००,००० कैद्यांना याची मदत झाली आहे. उरुग्वे मधील इंटीरिअर मंत्रालयाने ज्या कैद्यांनी आर्ट ऑफ लिविंग प्रीजन प्रोग्रॅम केला आहे त्यांची शिक्षा कमी केली आहे. श्री श्रीं ची जागतिक स्तरावरील भव्य अशी स्वयंसेवकांची टीम मानवी आघात आणि नैसर्गिक आपत्तीग्रस्त लोकांना जगभर सर्वतोपरी मदत करण्यात अग्रेसर असते. यामध्ये मेक्सिको, हैती, अमेरिका, जर्मनी, नेपाळ, भारत, पाकिस्तान, श्रीलंका, जपान अशी कित्येक नांवे आहेत. वैयक्तिक स्तरावर श्री श्रीं च्या आत्म विकास कार्यक्रमांमुळे जगभरातील कोट्यावधी लोकांना तणाव मुक्त आणि शांत, स्वस्थ आणि निरामय जीवन प्राप्त होण्यासाठी मदत झाली आहे. या कार्यक्रमांमध्ये आजच्या आधुनिक जीवनशैलीसाठी उपयुक्त अश्या प्राचीन योग प्रक्रिया आणि श्री श्रींनी मानवजातीला दिलेली सुदर्शन क्रिया ही संजीवक अशी प्रभावी श्वसन प्रक्रिया आहे जिच्यामुळे शारीरिक, मानसिक आणि भावनिक आरोग्य प्राप्त होते. नामांकित वैद्यकीय संस्थांनी केलेल्या स्वतंत्र संशोधन अवहालामध्ये या प्रक्रियांमुळे तणावाचे उन्मूलन तसेच कॉर्टीसॉल (तणाव निर्माण करणारे संप्रेरक) ची पातळी कमी होऊन प्रतिकार शक्ती मजबूत होते, असे नमूद केले आहे. जेथे संपूर्ण जग हे धार्मिक, सामाजिक, राष्ट्रीय आणि सांस्कृतिक पातळीवर विभागलेले असताना, श्री श्रींचा संदेश ‘वसुधैव कुटुंबकम्’ – हे संपूर्ण विश्व एक परिवार हा आहे आणि ते म्हणतात विविध धर्म, संस्कृती आणि परम्परा यांचे मूळ प्रेम, करूणा, शांती आणि अहिंसा या मानवी मूल्यांमध्ये आहे. न भूतो न भविष्यति असा ‘विश्व सांस्कृतिक महोत्सव २०१६’ हे याचेच प्रतिबिंब होय. सर्व धर्म आणि संस्कृतींच्या विविधतेचा उत्सव साजरा करत या महोत्सवात १५५ देशातील साडे सदतीस लाख लोक एकत्र आले आणि जगभरातून आलेल्या ३६,६०२ नर्तक आणि संगीतकारानीं ७ एकरच्या स्टेजवर नेत्रदीपक सादरीकरण केले. श्री श्रीं ना कोलंबिया, मंगोलिया आणि पॅराग्वे या देशातील सर्वोच्च नागरी पुरस्कारांसह जगभरातील खुपसे पुरस्कार मिळाले आहेत. विशेष आणि प्रतिष्ठित सेवेबध्दल भारताच्या राष्ट्रपतींनी त्यांना देशातील सर्वोच्च नागरी पुरस्कार ‘पद्म विभूषण’ सन्मानाने सन्मानित केले आहे. हा पुरस्कार असाधारण और विशिष्ट सेवेसाठी दिला जातो. जगभरात त्यांना २१ विविध ऑनररी डॉक्टरेट नी सन्मानित केले आहे. ‘द्वेष आणि दुःख यावर प्रेम आणि ज्ञान यांनी विजय मिळवता येऊ शकतो’ हा साधा पण शक्तिशाली संदेश घेऊन श्री श्री दरवर्षी जवळपास ४० देशांमध्ये प्रवास करत असतात.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# नेपाळमध्ये लोकशाही विनाविरोध झाली आहे !



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**नेपाळमधील सर्वात मोठा आणि प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या नेपाळी काँग्रेसने पंतप्रधान प्रचंड यांच्या विश्वासदर्शक ठरावाला धक्कादायक पाठिंबा दिला आहे. शेर बहादूर देउबा यांचा हा मोठा राजकीय डाव मानला जात आहे. नुकतेच नेपाळमध्ये नवीन सरकार स्थापन झाले आहे. नेपाळमध्ये लोकशाही विनाविरोध झाली आहे, असे म्हटले तर सर्वांनाच धक्का बसेल. तेही अशा परिस्थितीत जेव्हा नेपाळचा सर्वात मोठा पक्ष विरोधी भूमिकेत आहे. १० जानेवारीला तिथल्या संसदेत असाच काहीसा प्रकार घडला, ज्यामुळे नेपाळची लोकशाही विनाविरोध दिसली.**

सामान्यतः लोकशाहीतील संसदीय व्यवस्थेत सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष या दोघांनाही खूप महत्त्व असते. संसदीय व्यवस्थेत सत्ताधारी पक्षाला अनेक मुद्द्यांवर विरोधकांचा पाठिंबा मिळतो. संसदेत काही विधेयकांवर एकमत होणे सामान्य आहे. पण जेव्हा सरकारला विश्वासदर्शक ठरावाद्वारे सभागृहात आपले बहुमत सिद्ध करायचे असते, तेव्हा विरोधकांनीही त्या प्रस्तावाच्या बाजूने मतदान केल्याचे कुठेच दिसत नाही. १० जानेवारी रोजी नेपाळी संसदेच्या प्रतिनिधीगृहातही असेच घडले.

**पंतप्रधान 'प्रचंड' यांना संसदेत प्रचंड पाठिंबा मिळाला**

पुष्प कमल दहल 'प्रचंडा' (पुष्प कमल दहल) २६ डिसेंबर रोजी तिसऱ्यांदा नेपाळचे पंतप्रधान बनले. नेपाळचे नवे पंतप्रधान 'प्रचंड' यांनी प्रतिनिधीगृहात आपले बहुमत सिद्ध करण्यासाठी विश्वासदर्शक ठराव आणला. त्यांना बहुमतासाठी २७५ सदस्यांच्या सभागृहात १३८ मतांची गरज होती. १० जानेवारी रोजी प्रतिनिधीगृहात उपस्थित २७० पैकी २६८सदस्यांनी पंतप्रधान प्रचंड यांच्या समर्थनार्थ मतदान केले. सत्ताधाऱ्यांसोबतच विरोधी पक्षातील जवळपास सर्वच सदस्यांनी प्रचंड यांच्या समर्थनार्थ मतदान केले. प्रचंड यांच्या विरोधात केवळ दोन सदस्यांनी मतदान केले.

**लोकशाहीच्या युगात नेपाळमध्ये विरोधक विना**

१० जानेवारी रोजी नेपाळच्या संसदेत जे घडले त्यावरून असे दिसते की नेपाळने विरोधाशिवाय लोकशाहीच्या युगात प्रवेश केला आहे. कोणत्याही देशातील लोकांच्या हितासाठी ते फायदेशीर ठरत नाही. नेपाळच्या राजकारणाने ज्याप्रकारे वळण घेतले आहे, त्यामुळे भारतासोबतच्या संबंधांवरही त्याचा परिणाम होईल का, असा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. नेपाळमध्ये २० नोव्हेंबर रोजी सार्वत्रिक निवडणुका झाल्या.

नेपाळमध्ये २० नोव्हेंबर रोजी सार्वत्रिक निवडणुका झाल्या. या अंतर्गत तेथील जनतेने नेपाळी संसदेच्या प्रतिनिधीगृहासाठी मतदान केले होते. या निवडणुकीत मुख्य लढत ६ पक्षांची सत्ताधारी आघाडी आणि चार पक्षांची विरोधी आघाडी यांच्यात होती. सत्ताधारी आघाडीचे नेतृत्व नेपाळी काँग्रेसचे नेते आणि तत्कालीन पंतप्रधान शेर बहादूर देउबा यांच्याकडे होते. या आघाडीत नेपाळी काँग्रेस, कम्युनिस्ट पार्टी ऑफ नेपाळ (माओवादी केंद्र), नेपाळ समाजवादी पार्टी, नेपाळ कम्युनिस्ट पार्टी (युनिफाइड सोशालिस्ट), डेमोक्रॅटिक समाजवादी पार्टी नेपाळ आणि राष्ट्रीय जनमोर्चा यांचा समावेश होता. सध्याचे पंतप्रधान पुष्प कमल दहल 'प्रचंड' हे नेपाळच्या कम्युनिस्ट पक्षाचे (माओवादी-केंद्र) नेते आहेत जे या आघाडीत सामील होते. विरोधी युतीमध्ये नेपाळ कम्युनिस्ट पार्टी (युनिफाइड मार्क्सिस्ट-लेनिनिस्ट) (CPN-UML), नेपाळ परिवार दल, राष्ट्रीय प्रजातंत्र पार्टी नेपाळ आणि जनता समाजवादी पार्टी यांचा समावेश होता. CPN-UML नेते आणि नेपाळचे माजी पंतप्रधान केपी शर्मा ओली यांच्या नेतृत्वाखाली ते होते. २७५ सदस्यांच्या प्रतिनिधीगृहात १६५ सदस्य प्रत्यक्ष मतदानाद्वारे निवडले जातात आणि उर्वरित १०० सदस्य प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या आधारे निवडले जातात. प्रचंड नाटकीय पद्धतीने पंतप्रधान झाले आहेत. निकालात शेर बहादूर देउबा यांचा नेपाळी काँग्रेस ८९ जागा जिंकून सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. प्रचंड यांच्या कम्युनिस्ट पार्टी ऑफ नेपाळला (माओवादी केंद्र) ३२ जागा मिळाल्या. दुसरीकडे विरोधी छावणीत असलेल्या केपी शर्मा ओली यांच्या सीपीएन-यूएमएलला ७८ जागा मिळाल्या. निकालानंतर नेपाळी काँग्रेसचे शेर बहादूर देउबा पंतप्रधान होतील असे वाटत होते, पण प्रचंड यांनी सारा खेळच बदलून टाकला. पुष्पकमल दहल 'प्रचंड' यांनी देउबा यांना पंतप्रधान होण्यासाठी पाठिंबा देण्यास नकार दिला. त्यांना स्वतः पंतप्रधान व्हायचे होते, म्हणून देउबा यांना पाठिंबा देण्यास सांगितले. नेपाळी काँग्रेसचे नेते शेर बहादूर देउबा यांनी तसे करण्यास नकार दिला. यानंतर प्रचंड यांनी निवडणुकीत विरोधक असलेल्या केपी शर्मा ओली यांच्याशी हातमिळवणी केली. ओली यांनी प्रचंड यांना पंतप्रधान बनवण्यास सहमती दर्शवली आणि याद्वारे ओली यांच्या सीपीएन-यूएमएलने प्रचंड यांच्या कम्युनिस्ट पार्टी ऑफ नेपाळ (माओवादी केंद्र) सोबत सत्तेत सहभागी झाले. तीन सर्वात मोठ्या पक्षांमध्ये सर्वात कमी जागा मिळाल्या असूनही, प्रचंड हे राजकीय हेराफेरीद्वारे पंतप्रधान बनण्यात यशस्वी झाले. विशेष म्हणजे प्रचंड ज्यांच्यासोबत निवडणूक लढले, तोच नंतर त्यांचा विरोधक बनला आणि ज्याच्या विरोधात निवडणूक लढला त्याच्या पाठिंब्याने पंतप्रधान झाले.

**शेर बहादूर देउबा समोर काय मजबुरी होती ?**

जेव्हा पुष्प कमल दहल यांनी केपी शर्मा ओली यांच्याशी पंतप्रधान होण्यासाठी हातमिळवणी केली तेव्हा शेर बहादूर देउबाची नेपाळी काँग्रेस प्रचंड यांना संसदेत बहुमत सिद्ध करण्यापासून रोखेल असा विश्वास होता. सर्व राजकीय अनुमानांच्या उलट, शेर बहादूर देउबा यांच्या पक्षाच्या सर्व




सदस्यांनीही विश्वासदर्शक ठरावाला पाठिंबा दिला. विश्वासदर्शक ठरावादरम्यान कट्टर विरोधक केपी शर्मा ओली यांनी शेर बहादूर देउबा यांच्या वृत्तीने आश्चर्य व्यक्त केले. प्रश्न असा पडतो की, अशी कोणती मजबुरी होती, ज्यामुळे शेर बहादूर देउबा यांनी प्रचंड यांना शेवटच्या क्षणी साथ दिली. त्यानंतर नेपाळी काँग्रेसचे संयुक्त सरचिटणीस महेंद्र यादव म्हणाले की, नेपाळी काँग्रेस सरकारमध्ये सहभागी होणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले असले तरी हा पक्षाच्या सहमतीने घेतलेला निर्णय आहे.

**शेर बहादूर देउबा हे राजकीय खेळाडू आहेत**

नेपाळी काँग्रेसचे नेते शेर बहादूर देउबा हे राजकारणातील पारंगत खेळाडू आहेत. देउबा ५ वेळा नेपाळचे पंतप्रधान झाले आहेत. नोव्हेंबर २०२२ मध्ये नेपाळमध्ये सार्वत्रिक निवडणुका होत असताना देउबा पंतप्रधान होते. निवडणुकीत त्यांच्या पक्षाला आणि आघाडीला ज्या प्रकारे जागा मिळाल्या, त्यामुळे सहाव्यांदाही देशाचे पंतप्रधान होण्यात यश मिळेल, असा विश्वास देउबा यांना वाटत होता. पण प्रचंड यांची बाजू बदलल्याने ते होऊ शकले नाही. विश्वासदर्शक ठरावाच्या एक दिवस आधी पंतप्रधान प्रचंड यांनी नेपाळी काँग्रेसचे अध्यक्ष शेर बहादूर देउबा यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली आणि इथून सर्व काही बदलले.

**अध्यक्षपदावर डोळा आहे का ?**

नेपाळमध्ये फेब्रुवारीमध्ये पुढील राष्ट्रपतींसाठी निवडणुका होणार आहेत. नेपाळी काँग्रेसचे पीएम प्रचंड यांना पाठिंबा दिल्यानंतर ७६ वर्षीय शेर बहादूर देउबा यांच्याकडे अध्यक्षपदाकडे लक्ष असल्याचे बोलले जात आहे. नेपाळमध्ये राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसाठी इलेक्टोरल कॉलेजमध्ये ८८४ सदस्य आहेत. यामध्ये प्रतिनिधीगृहाचे२७५ सदस्य, नॅशनल असेंब्लीचे ५९ सदस्य, नेपाळी संसदेचे वरचे सभागृह आणि सात प्रांतांच्या विधानसभेचे ५५०सदस्य आहेत. मात्र, खासदार आणि विधानसभा सदस्य यांच्या मताचे वजन वेगळे असते. प्रचंड यांच्यासोबतची युती अबाधित राहिली असती तर नेपाळी काँग्रेसचा एक सदस्य राष्ट्रपती होण्याची शक्यता निश्चित होती. पण आता बदललेल्या समीकरणात नेपाळी काँग्रेससाठी ते तितकेसे सोपे नाही. सीपीएन (माओईस्ट सेंटर) चे पुष्प कमल दहल यांना बहुमत मिळवून देण्यासाठी शेर बहादूर देउबा यांना राष्ट्रपती निवडणुकीशी संबंधित समीकरणे जुळवायची आहेत. याशिवाय लोकप्रतिनिधी सभागृहाच्या अध्यक्षांची निवड होणे बाकी आहे. उपाध्यक्षपदाचीही निवडणूक होणार आहे. शेर बहादूर देउबा यांच्या पक्षाचाही या पदांवर डोळा आहे.

**नेपाळच्या लोकशाहीसाठी हे चांगले लक्षण नाही**

तिथल्या सत्तेत वाटा उचलण्यासाठी सर्व पक्षांनी एकजूट दाखवल्याचे नेपाळी काँग्रेसच्या वृत्तीवरून दिसते. ही परिस्थिती कोणत्याही लोकशाहीसाठी योग्य नाही. नेपाळसमोर आणखी एक संकट उभे राहिले आहे. नेपाळच्या राजकारणात नेहमीच अस्थिरता राहील. पुष्प कमल दहल, केपी शर्मा ओली आणि शेर बहादूर देउबा कोण कोणाच्या दरबारात पडेल याची भीती कायमच असते. केपी शर्मा ओली यांना भीती वाटेल की यापुढे त्यांच्या पक्षाचे सरकारमध्ये सारखे लक्ष जाणार नाही. त्याचबरोबर आपल्यापेक्षा मोठे दोन्ही पक्ष हातमिळवणी करून नेपाळमधील सत्ता कधीही बदलू शकतात याची भीती पंतप्रधान प्रचंड यांना असेल. याशिवाय लोकशाहीत सरकारवर विरोधकांचा ज्या प्रकारचा दबाव असायला हवा, तोही संपत चालला आहे.

**भारतासोबतच्या संबंधांवर परिणाम होऊ शकतो**

नेपाळी काँग्रेसचे शेर बहादूर देउबा यांचा भारताबाबतचा दृष्टिकोन पुष्प कमल दहल आणि ओली यांच्यापेक्षा अधिक सकारात्मक आहे. दुसरीकडे, नेपाळचे नवनियुक्त पंतप्रधान पुष्पकमल दहल यांचा नेहमीच चीनकडे कल राहिला आहे. मात्र, यावेळी पंतप्रधान झाल्यानंतर २७ डिसेंबर रोजी पुष्प कमल दहल प्रचंड यांनी भूतकाळ विसरून भविष्यात भारतासोबतचे संबंध सुधारायचे असल्याचे म्हटले होते. या विधानानंतर काही दिवसांनी, ९ जानेवारी रोजी, प्रचंड यांच्या नेतृत्वाखालील सत्ताधारी आघाडीने एक समान किमान कार्यक्रम जारी केला. या दस्तऐवजात असे काही म्हटले होते, ज्याचा भारतासोबतच्या संबंधांवर परिणाम होऊ शकतो. यामध्ये प्रचंड सरकारने लिम्पियाधुरा, कालापानी आणि लिपुलेख हे क्षेत्र भारतातून परत आणण्याचे आश्वासन दिले आहे. भारताने या भागांवर बेकायदेशीरपणे कब्जा केल्याचा नेपाळचा दावा आहे. प्रचंड सरकारने कॉमन मिनिमम प्रोग्राममध्ये भारतासोबतच्या सीमा विवादाचा उल्लेख केला आहे, परंतु नेपाळचा चीनसोबतचा सीमावाद या दस्तऐवजात मौन बाळगण्यात आला आहे. यावरून पुष्पकमल दहल यांची आगामी काळात भारताबाबत कोणती वृत्ती अंगीकारणार आहे, याचा अंदाज बांधता येतो.

**सीमावादावर नेपाळ सरकार पुन्हा एकदा बोलले**

भारत आणि नेपाळमध्ये लिम्पियाधुरा, कालापानी आणि लिपुलेख या भागांवरून वाद सुरू आहे. २०१९ मध्ये नेपाळचे तत्कालीन पंतप्रधान केपी शर्मा ओली यांनी हा मुद्दा भारतासमोर मांडण्याचा प्रयत्न केला. भारताच्या नकाशात लिम्पियाधुरा, कालापानी, लिपुलेख या भागांना आक्षेप घेत त्यांनी हा मुद्दा राजनयिक मार्गाने भारतासमोर मांडला. भारताचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी मे २०२० मध्ये उत्तराखंडमधील धारचुला ते चीनच्या सीमा लिपुलेखपर्यंतच्या रस्त्याचे उद्‌घाटन केले. त्यावेळी नेपाळने हा रस्ता आपल्या हद्दीतून गेल्याचा दावा केला होता. हा भाग भारतीय हद्दीत येतो. नंतर मे २०२० मध्ये, नेपाळच्या ओली सरकारने नेपाळचा एक नवीन नकाशा जारी केला, ज्यामध्ये लिम्पियाधुरा, कालापानी आणि लिपुलेख हे क्षेत्र नेपाळच्या हद्दीत असल्याचे दाखवले. भारताच्या सीमेत येणारा ४०० चौरस किलोमीटरचा क्षेत्र नेपाळच्या नकाशात दाखवण्यात आला होता आणि या नकाशाला नेपाळच्या संसदेनेही मान्यता दिली होती. नकाशाच्या वादानंतर भारत-नेपाळ संबंध अत्यंत बिकट टप्प्यात पोहोचले होते. ब्रिटिश राजवटीत १८१६ मध्येच कालापानी प्रदेशात सीमा निश्चित करण्यात आल्या होत्या.

**सीमावादावर प्रचंड यांची भूमिका काय ?**

जुलै २०२१ मध्ये, ओलीच्या जागी शेर बहादूर देउबा पंतप्रधान झाल्यानंतर, भारत-नेपाळ संबंध पुन्हा सुधारू लागले. पण आता नेपाळच्या नवीन सरकारने म्हणजेच प्रचंड सरकारने देशातील जनतेला हे क्षेत्र भारतातून परत आणण्याचे आश्वासन दिले आहे. यावरून नेपाळच्या पंतप्रधानांची मानसिकता दिसून येते की ते भारताशी संबंध सोडवण्याबाबत किती गंभीर आहेत. नेपाळ सरकारच्या या वृत्तीचा दोन्ही देशांमधील संबंधांवर परिणाम होऊ शकतो.

**प्रचंड यांचा कल चीनकडे**

तिसर्‌यांदा नेपाळचे पंतप्रधान बनलेल्या पुष्पकमल दहल यांना चीनबद्दल नेहमीच अधिक ओढ आहे. ऑगस्ट २००८ मध्ये, जेव्हा प्रचंड पहिल्यांदा नेपाळचे पंतप्रधान झाले, तेव्हा त्यांनी परंपरा तोडली आणि त्यांनी पहिल्या परदेश दौऱ्यासाठी भारताऐवजी चीनची निवड केली. त्याआधी जवळपास ५ दशकात जो कोणी नेपाळचा पंतप्रधान झाला, तो पहिल्या परदेश दौऱ्यासाठी भारतालाच पसंती द्यायचा. तथापि, ऑगस्ट २०१६मध्ये जेव्हा प्रचंड दुसऱ्यांदा पंतप्रधान झाले तेव्हा त्यांनी त्यांच्या पहिल्या परदेश दौऱ्यासाठी भारताची निवड केली. यावेळीही पंतप्रधान झाल्यानंतरही प्रचंड यांनी आपल्या पहिल्या परदेश दौऱ्यावरच नवी दिल्लीची निवड करणार असल्याचे संकेत दिले आहेत. फेब्रुवारी-मार्चमध्ये ते भारत दौऱ्यावर येण्याची शक्यता आहे. मात्र भारत दौऱ्यापूर्वी समान किमान कार्यक्रमात सीमा वादाला स्थान देऊन त्यांनी या संपूर्ण प्रकरणाचा पुन्हा धुरळा उडवला आहे. संसदेत बहुमत मिळवल्यानंतर प्रचंड यांनी नेपाळ सर्व देशांशी संतुलित आणि मैत्रीपूर्ण संबंध ठेवण्याचा प्रयत्न करणार असल्याचे म्हटले आहे. त्यात भारत आणि चीन या शेजारी देशांचाही समावेश आहे.

**नेपाळ भारत संबंध**

भारत-नेपाळ यांना १८५० किमीची आंतरराष्ट्रीय सीमा आहे. सिक्कीम, पश्चिम बंगाल, बिहार, उत्तर प्रदेश आणि उत्तराखंड ही पाच राज्ये दोन्ही राज्यांच्या सीमा सामायिक करतात. सामरिक दृष्टिकोनातून नेपाळ भारतासाठी खूप महत्त्वाचे आहे. दुसरीकडे, नेपाळसाठी भारत नेहमीच मोठ्या भावाच्या भूमिकेत राहिला आहे. १९५०पासून भारत नेपाळला प्रत्येक संकटात मदतीचा हात पुढे करत आहे. एप्रिल आणि मे २०१५ मध्ये झालेल्या भीषण भूकंपामुळे झालेल्या विनाशाचा सामना करण्यासाठी भारताने नेपाळला आर्थिक तसेच मानवतावादी मदत दिली होती. भारताने त्यावेळी सुमारे ६७ दशलक्ष डॉलर्सची आर्थिक मदत दिली होती. भूकंपाच्या विध्वंसानंतर, भारताने पुनर्बांधणीसाठी एक अब्ज डॉलर्सची मदत जाहीर केली होती, ज्यामध्ये अत्यंत कमी व्याजावर अनुदान आणि कर्ज या दोन्हींचा समावेश होता. भारत नेपाळचा सर्वात मोठा व्यापारी भागीदारही आहे. नेपाळच्या दोन तृतीयांश पेक्षा जास्त परकीय व्यापार भारतासोबत आहे. नेपाळ हा भूपरिवेष्टित देश आहे, जो भारताने तिन्ही बाजूंनी वेढलेला आहे. ऊर्जा आणि अन्नधान्यासाठी नेपाळ भारतावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे. नेपाळमधील २३९ वर्षे जुनी राजेशाही २००८ मध्ये संपली आणि खर्‌या अर्थाने येथे लोकशाही आली. या १५ वर्षात नेपाळमध्ये १३ सरकारे बदलली आहेत. नेपाळमध्ये २०१५ मध्ये नवीन संविधान स्वीकारण्यात आले. त्याआधी नेपाळच्या जनतेला दशकभर चाललेल्या माओवाद्यांचा रक्तरंजित संघर्ष आणि त्यानंतर दशकभराच्या राजकीय अस्थिरतेला सामोरे जावे लागले. नेपाळमध्ये संविधान स्वीकारल्यानंतर नोव्हेंबर २०२२ मध्ये दुसऱ्यांदा सार्वत्रिक निवडणुका झाल्या. नेपाळी काँग्रेसला नेपाळमधील जनतेचा पाठिंबा मिळाला, पण ती बहुमतापासून दूरच राहिली. आता नेपाळी काँग्रेसने संसदेत सर्वात मोठा आणि विरोधी पक्ष असूनही प्रचंड सरकारला बहुमत मिळवण्यासाठी मदत केली. यावरून भविष्यात सीमावादावर सर्व प्रमुख पक्षांचा पाठिंबा नेपाळ सरकारला मिळेल आणि त्याचा फायदा घेत पंतप्रधान पुष्पकमल दहल या मुद्द्यावर अधिक लक्ष देतील. भारत नेपाळ संबंधावर त्यांचा परिणाम होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

# खिशातील पेन हरवली का ?




सोनू दरेगावकर
संपर्क क्र. 7507161537

आधुनिक केसरी

**लहानपणी आम्ही शाळेत जाताना पाठीवर बॅग घेऊन शाळेत जायचे. गुरुजी आम्हाला काळी पाटी आणि खडू देऊन त्या काळ्या पाटीवर बाराखडी गिरवायला सांगायचे, थोडे-थोडे मोठं होत गेलो की, पाटी सुटली आणि हातात वही आणि खिशाला पेन आली. लहानपणच्या स्वप्नांना त्या वहीवर गिरवून काढायच आणि त्यातच पोटभर जेवण केल्यासारखा आनंद सुध्दा मिळायचा, परंतु हल्लीच्या काळात पेनही माणसाच्या खिशातून गायब होत चालली आहे. पहिलं कोणाकडेही मोबाईल नसायचे, तेंव्हा मात्र पत्र लिहून अनेकांना सुखं दुःख व्यक्त करायचे, परंतु आज एका क्षणात मोबाईलच्या सहाय्याने अनेकांपर्यंत सहज शक्य झालं. ही आनंदाची बाब म्हणावी लागेल.**

परंतु जेव्हापासून माणसं मोबाईलमुळे वेडे होऊन गेले. तेव्हापासून अनेकांच्या खिशातील पेन दिसायला मात्र तयार नाही. हा पेनचा दुरावा कशामुळे झाला. असेल तर यावर संशोधनाच्या बाबतीत मोबाईलमुळे हा प्रकार पहायला मिळतो. मागच्या काही वर्षांपूर्वी एखाद्या विशिष्ट ठिकाणी आपल्याला पत्र लिहून पाठवायचं असायचं तर आपण कोऱ्या कागदावर मजकूर लिहून पोस्टाच्या साहाय्याने पाठवायचे, आता तंत्रज्ञानाच्या काळात पत्र लिहिणे, पाठवणे ह्या बाबी मात्र खूप कमी प्रमाणात दिसत आहेत.

ई-मेल, व्हाट्सएपच्या माध्यमातून काही सेकंदाच्या आत तोच संदेश प्राप्त होत आहे. म्हणून अनेकांना हेच माध्यम सोयीचे वाटत आहे. परंतु आजही काही ठिकाणी पेन शिवाय कामच भागत नाही अस पण पाहायला मिळते. एखाद्या बँकेत किंवा शासकीय कार्यालयात पेनचा उपयोग मोठ्या प्रमाणात होतो. मग जी माणसं मोबाईलच्या माध्यमातून अनेक गोष्टी हाताळतात ती माणसं जर बँक किंवा शासकीय कार्यालये इथे जर गेले तर त्यांची मात्र खूप धावपळ पाहायला मिळते.



स्वतःच्या खिशात तीस हजार चाळीस हजार रुपयांचा महागड्या फोन वापरतात आणि स्वतःच्या खिशाला पाच रुपयांची पेन मात्र दिसत नाही. मग बँक किंवा शासकीय कार्यालयात गेल्यावर जेव्हा त्यांना पेनच काम पडतो तेंव्हा एक तर तेथील कर्मचारी यांना किंवा आजूबाजूला दिसलेल्या व्यक्तीला पेन आहे का तुमच्याकडे म्हणून विचारपूस केली जाते. आणि कोणाकडून तर पेन घेऊन त्यांचे काम भागवलं जाते. ज्या व्यक्ती कडून आपण पेन घेतो. पुन्हा त्या व्यक्तीला परत घेणं किंवा आपण त्याला परत देणं हे मात्र अनेकांच्या लक्षात राहत नाही. कधी-कधी पेन देणारा हा गरीब शेतकरी असतो आणि पेन घेणारा श्रीमंत असतो. तो पेन मोठ्या व्यक्तीला खूप आपुलकीने देतो आणि त्याचीच पेन पुन्हा परत मागण्यांसाठी त्याच्या मनात धाडस निर्माण होत नाही. कारण मोठी माणसं कधी काय बोलतील याचा काही अंदाज नसतो. हा शब्द हा अनेकांच्या डोक्यात खेळतो, म्हणून स्वतःहुन पेन मागण्याचा कधीच प्रयत्न करत नाहीत. पेनचा सहवास हा माणसापासून संपलेला दिसत आहे. ते म्हणतात ना.. "तहान लागली की, विहीर खोदावी" तसच काहीस पेन बाबत झाले. गरज पडली की, अनेकांची विनवणी करून स्वतःच्या खिशात लाखो रुपये असून सुद्धा पेनची भीक मागावी लागते, त्यामुळे प्रश्न पडतो की खरंच माणसाच्या खिशातील पेन हरवली का ?

# भारतीय हिंदू गुरु: स्वामी विवेकानंदजी !



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**भारत सरकारने सन १९८५मध्ये १२ जानेवारी या दिवसाला राष्ट्रीय युवा दिन म्हणून साजरा करायचे ठरवले. या दिवसाला असे काय महत्व आहे? तर या दिवशी स्वामी विवेकानंद यांची पावन जयंती असते. "उठा, जागे व्हा आणि तोपर्यंत थांबू नका जोपर्यंत तुम्हाला तुमचे ध्येय मिळत नाही" हा संदेश स्वामी विवेकानंद यांनी तरुणांना दिला. श्रीकृष्णदास (बापू) निरंकारीजीं यांच्या लेखणीतून जाणा उद्बोधक माहिती.**

भारतावर व जगावर स्वामी विवेकानंदांचा प्रभाव दिसून येतो. डॉ.बाबासाहेब आंबेडकर नेहरूंचे पीए एम.ओ.मथाई यांना म्हणाले होते की, "अलिकडच्या शतकात भारताने निर्माण केलेला सर्वात मोठा माणूस म्हणजे विवेकानंद आहेत, गांधी नव्हे." नेताजी सुभाषचंद्र बोस म्हणाले होते, "जोपर्यंत बंगालचा संबंध आहे, आम्ही विवेकानंदांना आधुनिक राष्ट्रीय चळवळीचे आध्यात्मिक पिता म्हणू शकतो." स्वामी विवेकानंदांच्या कार्याचा प्रभाव तत्कालीन समाजावर व त्यांच्या अनुयायांवर दोन वेगवेगळ्या प्रकारे पडला. काही विषय, व्यक्ती आणि प्रसंग यांवर त्यांनी कडाडून तोफ डागली. तर काही बाबतीत वाऱ्याच्या मंद झुळकीने फुलाची पाकळी जशी हळुवारपणे उमलते तसा त्यांचा प्रभाव होता. मानवी जीवनावर स्वामीजींच्या एकूण झालेल्या प्रभावाची अशी वर्गवारी करता येईल- त्यांनी वेदान्ताकडे पाहण्याची नवी दृष्टी दिली. निस्वार्थी मानवसेवा हाच खरा धर्म होय, असे त्यांनी आग्रहपूर्वक प्रतिपादन केले. भारतातील राष्ट्रीय, आध्यात्मिक चळवळी व इतर सामाजिक सेवाकार्ये या सगळ्यांच्या मागे प्रत्यक्षाप्रत्यक्षरीत्या स्वामीजींची प्रेरणा होती व आहे. पाश्चिमात्य जगात त्यांनी भारताचे आध्यात्मिक व सांस्कृतिक क्षेत्रातील दूत म्हणून भूमिका बजावली.

स्वामी विवेकानंद हे मूळचे बंगालचे रहिवासी असलेले भारतीय हिंदू विचारवंत होते. तरुणपणी ते रामकृष्ण परमहंस यांचे शिष्य झाले आणि रामकृष्णांचा संदेश जनमानसांत पोहचवण्यास त्यांनी रामकृष्ण मिशन सुरू केले. जगामध्ये रामकृष्ण मिशनच्या अनेक शाखा आहेत. भारत सरकारतर्फे विवेकानंदांचा जन्मदिवस हा युवक दिन म्हणून साजरा केला जातो. उत्तर कोलकत्ता सिमलापल्ली येथे दि.१२ जानेवारी १८६३ रोजी म्हणजेच पौष कृष्ण सप्तमी, संक्रांतीच्या दिवशी विवेकानंदांचा जन्म झाला. त्यांचे नाव नरेंद्र ठेवण्यात आले. वडील विश्वनाथ दत्त हे कोलकाता उच्च न्यायालयात वकीलाचे ॲटर्नी होते. ते सामाजिक आणि धार्मिक बाबीत पुरोगामी विचाराचे आणि दयाळू स्वभावाचे होते. आई भुवनेश्वरी देवी या धार्मिक वृत्तीच्या होत्या. नरेंद्रनाथांच्या विचारसरणीला आकार देण्यात त्यांच्या पालकांचा अनमोल वाटा होता. नरेंद्रनाथांना दर्शनशास्त्रे, इतिहास, समाजशास्त्रे, कला, साहित्य इत्यादी अनेक विषयांत रुची आणि गती होती. वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत, भगवतगीता आदि धार्मिक साहित्यात त्यांनी विशेष आवड दाखवली. त्यांना शास्त्रीय संगीताची देखील जाण होती. त्यांनी बेनी गुप्ता व अहमद खान या उस्तादांकडून गायन-वादनाचे रीतसर शिक्षणही घेतले. किशोरावस्थेपासूनच ते व्यायाम, खेळ आदी उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेत. जुनाट अंधश्रद्धा आणि जात्याधारित भेदभाव त्यांच्या वैधतेसंबंधी त्यांनी लहान वयातच प्रश्न उपस्थित केले होते. सारासार विचार व व्यवहारी दृष्टिकोन यांचा आधार नसलेली कुठलीही गोष्ट स्वीकारण्यास त्यांनी नकार दिला होता. विवेकानंद हे मित्र परिवारात प्रिय होते. त्यांचे



मित्र त्यांना बिले या नावाने तर त्यांचे गुरू नोरेन या शब्दाने हाक मारत. त्यांना वाचन, व्यायाम, कुस्ती, मुष्टियुद्ध, पोहणे, होडी वल्हवणे, घोडेस्वारी, लाठियुद्ध, गायन आणि वादन इत्यादी छंद होते. गुरूदेव रामकृष्णांनी नरेंद्रनाथांना संन्यासदीक्षा देऊन त्यांचे नामकरण स्वामी विवेकानंद असे केले. राजा अजितसिंग खेत्री यांनीही दि.१० मे १८९३ रोजी त्यांना विवेकानंद हेच नाव दिले.

स्वामी विवेकानंद म्हणजे योद्धा, संन्यासी, आणि तरुण पिढीचे अखंड प्रेरणास्रोत, ज्यांनी फक्त भारतातीलच नाही तर संपूर्ण जगातल्या युवा पिढीसमोर आदर्श ठेवला. सगळे देश भारताकडे मोठ्या आशेने बघत आहेत. का ? तर भारत एक संधीचा देश आहे. या देशात अनेक संधी आज वाट बघत आहेत. जग भारताकडे आशेने बघत आहे. कारण आज आपला देश सर्वात तरुण देश आहे. ज्या देशाची ६५ टक्के लोकसंख्या तरुण असेल, ३५ वर्षांच्या आतली असेल, तो देश किती भाग्यवान आहे! आमच्याकडे आज कोटी कोटी युवा जनता आहे. जिथे ही तरुणाई असते, तिथे संकल्पांना काही सीमा नसतात, बंधने नसतात.

कधी कधी आपल्या देशात युवकांच्या वेगवेगळ्या व्याख्या ऐकायला मिळतात. शास्त्रापासून आजपर्यंत तरुणाईच्या अनेक व्याख्या झाल्या आहेत. प्रत्येकाचा आपापला दृष्टीकोन असतो. अनेकांना वय हेच तारुण्याची ओळख आहे, असे वाटते. युवापिढी म्हणजे नव्या विचारांची आणि आधुनिकतेची सांगड घालून आपले म्हणणे समाजापुढे मांडणारी नव्या जोशाची पिढी आहे. खरे पाहता आपल्याला विविध प्रकारच्या क्षेत्रात चांगले यश पादाक्रांत करण्याची सुवर्ण संधी आणि पुरेसा वेळ आहे. भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी तरुणांची संख्या अधिक आहे. तरूण म्हणजे प्रचंड उत्साह, काहीतरी करून दाखवण्याची धडपड होय. तरुण म्हणजे प्रचंड जोश, तरुण म्हणजे अफाट इच्छाशक्ती अशी कितीतरी विशेषण तरुणांना लागू पडतात. जगात तरुणांची संख्या अधिक आहे, त्यामुळे विविध तंत्रज्ञानात तरुणांची भरारी विलक्षणीय आहे. कधी तरुणाईचे पाऊल भलत्याच दिशेने पडताना दिसत आहे. त्याचे कारण म्हणजे व्यसनाधीनता, चंगळवाद, सोशल मिडीयाचा अतिरेक आदी आहेत. ही तरुणपिढीला लागलेली वाळवी आहे. कुठल्याही देशाची प्रगती ही तिथल्या तरुणांवर अवलंबून असते त्यामुळे आपल्या देशाला भक्कम आधार आपण तरुणच देऊ शकतो, हे प्रत्येकाने ध्यानात घेणे गरजेचे आहे. विशेषतः भारताचे सरासरी वय हे २८ आहे. त्यामुळे भारत जगातील सर्वात तरुण देश ठरतो. युवा वर्गाने स्वःताला टेक्नॉलॉजीशी इतके सुसंगत ठेवले आहे, की ते जगाशी ओळख ठेवून आहेत. कुठे काय घडतेय हे त्यांना माहीत असते. पण याच टेक्नॉलॉजीशी ते इतके भावनिक गुंतले गेले आहेत, की त्यामुळे तिथूनच त्यांना नैराश्यही येते.

स्वामी विवेकानंदजींनी दि.४ जुलै १९०२ रोजी कोलकात्याजवळील बेलूर मठात समाधी घेतली. समाधीच्या दिवशी त्यांनी पहाटे बेलूर मठात परिव्राजकांना शुक्ल यजुर्वेदाचा पाठ शिकवला. स्वामी प्रेमानंद या गुरुबंधूंसमवेत काही काळ फिरून त्यांना रामकृष्ण मठाच्या भविष्यासंबंधात काही सूचना केल्या. ध्यान करत असतांना रात्री त्यांनी समाधी घेतली. चाळीस वर्षापर्यंत आपण जगणार नाही, ही स्वतःची भविष्यवाणी खरी केली. खरच आपणच आपले भविष्य घडवायला हवे. कोणावरही अवलंबून राहणे, हे योग्य नाहीच!

!!स्वामी विवेकानंदजींना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन व चिरतरुण भारताला राष्ट्रीय युवा दिवसाच्या प्रेरणादायी हार्दिक शुभेच्छा !!



# औषधी सुंठी

आधुनिक केसरी

१) मुळव्याध आहे सुंठपावडर पावचमचा किंवा एक ग्रॅम कपभर ताकात चिमूटभर सैधव घालून घेत जा.
२) अर्धशिशी, मायग्रेन दूधात सुंठ समभाग मिसळून नाक व कपाळावर लेप द्यावा. भुवया सोडून.
३) सुंठ वातनाशक असल्याने नर्व्हस सिस्टीम संबधीत सर्व आजारात सुंठ पाव छोटा चमचा एक चमचा मधात खावी.
४)पचनसंस्था मधील सर्व दोष सुधारण्याचे कार्य सुंठ करते. थोडक्यात डायजेस्टीव सिस्टीम सुधारते.चमचाभर मध पाणी व पाव छोटा चमचा किंवा एक ग्रॅम सुंठ घ्या.
५) एरंडेल एक चमचा व सुंठ पाव छोटा चमचा घेतली असता कावीळ बरी होते झटपट रोज सकाळी संध्याकाळी घेणे.
६) अरुची, पोटगच्च, मळमळ, फुगा होणे, डब्ब डब्ब होणे,वायुगोळा मुळे पोटात दुखणे धने, जीरे, सैधव समप्रमाणात व छोटा पाव चमचा सुंठ एकत्रित घेऊन गरमपाणी प्या. रिलिफ मिळतो. दिवसात एक वेळा.
६) अंगावर गांधी येऊन खाज येणे, शितपित, सूज, ह्रदयविकार, मुत्रपिंडाचे आजार सुंठ गुळ रोज खा चमचाभर गुळ व छोटा पाव चमचा सुंठ एक वेळा.
७ )हत्तीपाय, एलिफंन्टोसीस मध्ये छोटा पाव चमचा सुंठ व गुळ चमचाभर घेत जाणे दोनदा.
८) आमवातात बेस्ट औषध सुंठ छोटा पावचमचा व चमचा भर मध एक वेळा सारी दुखणी पळतात.
९) दमा असल्यास दालचिनी पावडर चिमूटभर, तमालपत्र पावडर चिमूटभर, लवंग, मिरी चिमूटभर व सुंठ एकत्रित करून दोनचमचे मधात घ्या.
१०) सुंठ चिमूटभर, जेष्ठमध चिमूटभर, हळद चिमूटभर एकत्रित करून मधात घ्या कफ,खोकला, सर्दी मुळे होणारे त्रास जातील.
११) पुरुषांचे शुक्राणू कमी असतील तर लोणी व तूपात सुंठ घ्या. स्पम काऊंट नक्कीच वाढतो.
१२) डोकेदुखी असेलतर सुंठ पावडरचा लेप लावा.
१३) आमवाता मूळे अचानक हातावर, गुडघ्याला सूज आली असेल तर तेलात सुंठ पावडर घालून लेप घ्या. १४) जास्त घाम येत असेल, अंग थंड पडत असेलतर सुंठ पावडर चोळा.
१५) अर्धशिशी ,मायग्रेन ,सायनस च्या त्रासात कांद्याच्या रसात सुंठ चिमूटभर घालून दोनवेळा घ्या. नागपुडीत आलेरस ,कांदारस एकत्रित घाला दोन दोन थेंब तीन वेळा..
१६) सुंठ व वावडींग चिमूटभर मधात घेतल्यास जंत पडून जातात.
१७) सुंठ, धमासा,वाळा,नागरमोथा, कुटकी यांचे समभाग घेऊन चुर्ण करा. व सगळे मिळून मोठा एक चमचा घ्या लहान मुलांना सगळं मिळून अर्धा चमचा.ताप झटक्यात उतरतो,पोटातील मलखडे साफ होतात.

# लढाई नामांतराची



मल्हारराव डोणगांवकर
संपर्क क्र. ९६३७९३७५७९

आधुनिक केसरी


**१४ जानेवारी १९९४ डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा नामविस्तार दिन) नामांतर - नामविस्तार झाले तरी कसे ? १४ जानेवारी १९९४ डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा नामविस्तार दिन नामांतर ! नामांतर !! नामांतर !!! मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर नाव हे साहजा सहजी मिळाले काय ? हे नामांतर झाले तरी कसे ? या करीता आंबेडकरी जनात व अनुयायांना फार मोठा संघर्ष करावा लागला. १९७८ ते १९९४ पर्यंत १६ वर्षे महाराष्ट्र भर दिर्घकालीन लढा द्यावा लागला. या आंदोलनाचे प्रमुख केंद्रस्थान मराठवाड्यातील औरंगाबाद नगरी हे होते.**




पोचीराम कांबळे हा नामांतरासाठी पहिला बळी जाणारा ठरला. या नामांतरासाठी बलिदान देणाऱ्या काही शहीदांची नांवे खालील प्रमाणे १) पोचीराम कांबळे, २)जनार्दन मवाडे, ३) गौतम वाघमारे, ४) गोविंदराव भुरेवार, ५) दिलिप रामटेके, ६) अविनाश डोंगरे, ७) रोशन बोरकर, ८) विलास पंडीत, ९) प्रतिभा तायडे, १०) सुहासिन बनसोडे, ११) चंदर कांबळे, १२) नारायण गायकवाड, १३) श्रद पाटोळे. तसेच या नामांतरासाठी विद्यार्थी तरुण, तरुणाई रस्त्यावर उतरली. किशोरवयीन मुले-मुलीही होती. शिक्षित-अशिक्षित पुरुषही होते. १६ वर्षाचा दिर्घकालीन लढाईत २७ जण बळी देऊन शहीद झाले. तत्कालिन वर्तमानपत्राच्या माहितीनुसार सरकारी अहवालाद्वारे नमुद करण्यात आले होते की, या कालावधीत मराठवाड्यातील १२४ दलित वस्ती वसाहतीवर हल्ले झाले. या हल्ल्यात १०६५ झोपड्या, घरे जळाली. तर ६३७० व्यक्ती जख्मी होऊन बाधित झाले.

हे नामांतर पदरात पाडुन घेण्यासाठी आंबेडकर जनतेला फार मोठी किंमत चुकवावी लागली. तेंव्हा कुठे ते मिळाले. म्हणतात स्त्री शक्तीही एकदा पेटून उठली की, कदापी ती माघार घेत नाही. यानुसार रणरागिनींनी पण रुद्रावतार धारण करुन आघाडीवर राहिल्यात. सर्वत्र नामांतरमय वातावरण असतांना प्रा. अनुराधा कांबळे यांच्या नेतृत्वाखाली प्रा. सुशीला मुलजाधव, शोभा लभाने या महिलांनी औरंगाबादला शांतता मोर्चा काढला. भर पावसात प्रा. सुशीला सर्वे, प्रा. सुजाता कांबळे, डॉ. कुंदा चौधरी यांच्यासह १५० महिलांनी अटक करुन घेतली. काहींनी येरवडा कारागृहात तुरुंगवासही भोगला. प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी मोठा लाँग मोर्चा काढला. यात हजारो महिलांनी सहभाग घेतला.

औरंगाबादच्या यमुनाबाई आप्पा गायकवाड या मातेने तर स्वतःच्या मुलीला १७७८ मध्ये मुख्यमंत्री वसंतदादा पाटील हे दौऱ्यावर याच कालावधीत आले असतांना स्वःच्या मुलीला त्यांच्या गाडीसमोर फेकले. काय म्हणावे या मातेला, धन्य ती माता नामांतरासाठी पोटच्या गोळयाला मंत्र्याच्या गाडीसमोर फेकण्याची कथा. नामांतराचे रणशिंग फुंकल्या गेले ते पँथर नेत्यांच्या योगदानाने मा. रामदास आठवले, ॲड. प्रितमकुमार शेगांवकर, ॲड. गंगाधर गाडे, ॲड. रमेशभाई खंडागळे, ॲड. रतनकुमार पंडागळे, मिलिंद शेळके, प्रकाश जावळे या तरुणाईचे रक्त सळसळणाऱ्या पँथर नायक हे अग्रस्थानी राहून नामांतर लढाई लढला. मराठवाडा विद्यापीठास डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नांव मिळावे करीता आ. उपेंद्र शेंडे यांनी ही पुढाकार घेतला. रिपब्लिकन पक्षाचे, खोब्रागडे गटाचे हे आमदार यांनी १५ ऑगस्ट १९९३ पासून मंत्रालया पुढे बेमुदत उपोषणास सुरुवात केली. या नामांतर लढ्यास काही विरोध करणारी मंडळी होती. नामांतरवादी जेष्ठ समाजवादी नेते एस.एम. जोशी यांना विरोधांकडून अवमान सहन करावा लागला. ते उदगीरला दौऱ्यावर असतांना नामांतर विरोधी तरुणांनी त्यांच्या गळयात चपलांचा हार टाकला. नंतर हीच चप्पलहार टाकणारी तरुणाई नांतातराच्या बाजुने सक्रीय झाली.



बाबा आढाव यांचीही हेटाळणी नामांतर विरोधकांनी केली.

परंतु दुसऱ्या बाजुने या लढयात संपूर्ण मंडळी नामांकित व राजकीय व्यक्ती सहभागी झाली. बाबा दळवी, भाई वैद्य, बापू वाळदाते, वसंत काळे, किसनराव देशमुख, विजय गव्हाणे, वसंत काळे, निहाल अहमद, तुकाराम पांचाळ, पांडुरंग साळवे ही मंडळी नामांतराच्या बाजूने राहून लढाईत सहभाग घेतला. दुर्दैवाने या नांमांतर लढाईला मराठयातून व राज्यातूनही प्रखर विरोध झाला होता. परंतु या विरोधाला न जुमानता आंबेडकरी जनमताने कंबर कसली, निदर्शने, मोर्चे, आंदोलने, बेमुदत उपोषणे, आत्म बलिदान सतत १६ वर्ष निकराने लढा दिला. खऱ्या अर्थाने अस्मिता नव्हे तर समतेचा लढा दिला, असहिष्णुतेशी लढा दिला. नामांतरा विषयी जे आंबेडकरी अनुयायांच्या तीव्र भावना या लढयाची प्रखरता लक्षात घेऊन राज्य सरकारने २७ जुलै १९७९ रोजी विधमंडळाच्या दोन्ही सभागृहात नामांतर ठराव मंजूर केला. मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे नांव देण्याचा निर्णय घेतला. १४ जानेवारी १९९४ रोजी राष्ट्रीय नेते मा. मुख्यमंत्री शरदचंद्रजी पवार यांनी नामविस्तार ठराव पारीत करुन कठोरपणे अंमलबजावणी केली. तेंव्हा कुठे नामांतर पहावयास मिळाले. करीता लढाई आत्मबलिदानाची, शहीदांची, लढाई नामातंराची. नामांतर - नामविस्तार झाले तरी कसे ?

१४ जानेवारी २०२३ डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा नामविस्तार दिनी विनम्र अभिवादन.

# उद्या नवसाला पावणाऱ्या भैरवनाथाची यात्रा

आधुनिक केसरी न्यूज

**गुलाब वाघ**

**गंगापूर :** तालुक्यातील लासुर स्टेशन ग्रुपग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या सावंगी, दायगाव, भानवाडी या गावासह पंचक्रोशीतील गावांचे आराध्य कुलदैवत असलेल्या व नवसाला पावणाऱ्या सावंगी येथील भैरवनाथ बाबाचा यात्रौत्सव रविवारी 15 तारखेला संक्रातीच्या शुभ पर्वावर सुरु होणार आहे त्यामुळे लासूर स्टेशन येथील रविवारी भरणारा आठवडी बाजार या रविवारी भैरवनाथ बाबांच्या मंदिर परिसरातील मोकळ्या मैदानात भरणार आहे तसेच त्यादिवशी संध्याकाळी लोकनाट्य तमाशा मंडळ आपली कला सादर करणार आहे. मात्र नवसाला पावणाऱ्या भैरवनाथ मंदिर अजूनही विकासकामापासून कोसो दूर असून मंदिराची स्वतःची जागा असूनही मंदिराचे बांधकाम करण्याची सुबुद्धी स्थानिक लोकप्रतिनिधी, ग्रामपंचायत गावपुढारी यांना भैरवनाथ बाबा देवो व मंदिराच्या जीर्णोउद्धर किमान या यात्रेच्या दिवशी करावा अशी मागणी गावकरी वर्गातून होत आहे.

भैवरावनाथ ट्रस्टचे मा.अध्यक्ष बद्रीनाथ रामभाऊ इंगळे, माजी ग्रामपंचायत सदस्य दिलीप पवार, प्रदीप पवार, दादा रुस्तुम पवार, विलास इंगळे, दत्तु पवार, युनुस शहा, कुलदीप पवार, गणेश पवार, जुनेद शहा, गफ्फार शाह, धनंजय पवार, मोबीन शहा, नाना पवार, अरुण पवार, नवनाथ इंगळे प्रदिप इंगळे आदींनी भैरवनाथ मंदिराचा जिर्णउद्धार करण्याची मागणी आता गावकरी मंडळी व समाजिक कार्यकर्ते यांच्या कडुण जोर धरत आहे.

प्रतिक्रिया :यात्रेच्या दिवशी भाविक भक्त भैरवनाथ बाबांचे दर्शन घेऊन मंदिरच्या पाठीमागील बाजूला असलेल्या ठिकाणावरून पुरातन काळापासून आजही वाळू पिशवीत घेऊन घरी नेतात व ही वाळू पर, अंगण, व्यवसायाचे ठिकाण या ठिकाणी असणाऱ्या वास्तूत मोकळ्या जागेत फेकतात यामागची वर्षानुवर्षाची अशी श्रद्धा आहे की भैरवनाथ बाबाच्या मंदिरातील वाळू अशी फेकल्याने आपल्या घरात कधीच साप, विंचू, व सरपटणारे विषारी प्राणी देवाच्या माहिमेमुळे येत नाही व सर्प दंश करत नाही अशी आखायिका आहे त्यामुळे सर्पदंश झालेल्या व्यक्तीला या मंदिरात आणल्याने विषबाधा कमी होते अशी भावना पूर्वपार चालत आलेली असून आजही चालू आहे. **(प्रदीप पवार, गावकरी)**





# सिन्नर-शिर्डी महामार्गावर मालवाहू ट्रक व आराम बसच्या अपघातात १० जण ठार

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** सिन्नर-शिर्डी महामार्गावर पाथरे गावानजीक हॅाटेल वनराई जवळ खासगी आराम बस आणि ट्रकचा आज पहाटे अपघात झाला असून या अपघातात आतापर्यंत १० जणांचा मृत्यू झाला असून ३५ जण जखमी झाल्याची माहिती मिळत आहे. आज सिन्नर-शिर्डी महामार्गावर पाथरे गावानजीक हॅाटेल वनराई जवळ ट्रक (एम.एच.४८ टी.१२९५) आणिखासगी आराम बसचा (एम.एच.०४ एस. के.२७५१) अपघात झाला आहे. हा अपघात अत्यंत भीषण असल्याने दोन्ही वाहनांचा चुराडा झाला आहे. या अपघातात १० जण ठार झाले असून ३५ प्रवाशी जखमी झाले आहेत. सर्व प्रवाशांवर सिन्नर येथील वेगवेगळ्या खाजगी रुग्णालयांमध्ये उपचार सुरू आहे. पहाटे साडेसहा वाजता अपघात झाल्यानंतर पाथरे येथील शेतकरी व तरुणांनी धाव घेत मदतकार्य सुरू केले. वावी पोलीस ठाण्यासह महामार्ग सुरक्षा विभागाची कुमकही अपघात स्थळी दाखल झाली होती. सुमारे १२ ते १५ रुग्णवाहिकांमधून जखमींना सिन्नरकडे हलवण्यात आले. या अपघतात प्रमिला प्रकाश गोंधळी (वय-४५), वैशाली नरेश उबाळे (वय ३२), श्रावणी सुहास बारस्कर (वय ३०), श्रध्दा सुहास बारस्कर (वय-४), नरेश मनोहर उबाळे (वय-३८) हे सर्व रा.अंबरनाथ येथील रहिवासी आहेत. बालाजी कृष्णा मोहंती (वय २५) चालक, दिक्षा संतोष गोंधळी (वय१८) रा.कल्याण आयुष्मान ऊर्फ साई प्रशांत महंती ( वय ५) वर्ष, रोशनी राजेश वाडेकर (वय ३०) यांचा या अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला आहे. तर या अपघातात जखमी झालेले निधी उभळे, माया जाधव, प्रशांत मोहंसी, सिमा नेके, सपना डांगे, हर्षद वाडेकर, धनिषा वाडेकर, शिवण्या बवस्कर, आशा जयस्वाल, योगिता वाडेकर, योगीता वाडेकर, रंजना वोटले, सुप्रिया साहिल, ऋतीका रौंधळ, वषीराणी बेहरा, सुहास बावस्कर ,वर्षाराणी बेहरा, योगिता वाडेकर, श्रुतिका गोंधळी, रंजन पोटले यांच्यावर सिन्नर येथील खाजगी हॅास्पिलमध्ये उपचार सुरू आहे.

**मुख्यमंत्र्यांकडून शोक व्यक्त**

या अपघाताचे वृत्त कळताच मुख्यमंत्री मा .एकनाथ शिंदे यांनी नाशिक विभागीय आयुक्त तसेच जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा करून याविषयी अधिक माहिती घेतली असून मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी पाच लाखांची मदत जाहीर केली आहे. जखमींवर शासकीय खर्चाने आवश्यक ते उपचार करण्याचे निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले आहेत.

# पैठण येथे आयुर्वेदिक हॉस्पिटलचे मंत्री रावसाहेब दानवे यांच्या हस्ते उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** शहरालगतच असलेल्या पैठण-शेवगाव रोडवर संत एकनाथ आयुर्वेदिक हॉस्पिटलचे उद्घाटन केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे,यांच्या हस्ते शुक्रवारी दि,१४ रोजी औरंगाबादचे पालकमंत्री संदिपान भुमरे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले.

यावेळी मंत्री दानवे यांनी तरुण शेतकर्यांना मोलाचा सल्ला दिला कि कार्यकर्ते म्हणून फिरण्यापेक्शा सरकारच्या शेती आधारित विविध योजनाचा कसा फायदा घेता येईल ते पाहिले पाहिजे,आणि पालकांनी सुध्दा मुलं काय शिकताना काय शिक्षण द्यायला पाहिजे या कडे काटेकोर पणे लक्ष देणे गरजेचे आहे.

माजी नगराध्यक्ष सुरज लोळगे यांनी या संत एकनाथ आयुर्वेदिक हॉस्पिटलची ईमारत उभी करून पैठण शहराचा मान वाढवल्याने त्याचे कौतुकाने अभिनंदन केले पाहिजे असे मंत्री संदिपान भुमरे यांनी मनोगत व्यक्त केले.

संत एकनाथ आयुर्वेदिक हॉस्पिटलमध्ये नागरिकांना वैद्यकीय सुविधा अल्प दरात उपलब्ध करून देण्याचा आमचा मानस राहील असे माजी नगराध्यक्ष सुरज लोळगे यांनी प्रस्थाविकातुन सांगितले. ईथे पुढील वर्षांपासून विद्यार्थ्यांना प्रवेश मिळणार असुन प्रथम ६० विद्यार्थ्यांना प्रवेश मिळेल.

यावेळी महाराष्ट्र राज्य दुध संघ महानंदचे संचालक नंदलाल काळे,भाजपाचे जिल्हा सरचिटणीस लक्ष्मण औटे,माजी आमदार पवार,नाथ वंशज रावसाहेब महाराज गोसावी, दादा बारे,डॉ.राम लोंढे,डॉ. जोशी,डॉ.विष्णू बाबर,डॉ.मोरे,राजेंद्र लोळगे,चेअरमन तुषार शिसोदे,राजेंद्र औटे,शेखर शिंदे,पवन लोहिया,बळराम लोळगे,किशोर चौधरी,बालाजी नलभे,आदीची उपस्थिती होती.



# दौलताबाद ग्रामपंचायत उपसरपंचपदी जावेद सत्तार शेख यांनी बिनविरोध निवड



आधुनिक केसरी न्यूज

**दौलताबाद :** ग्रामपंचायत उपसरपंचपदी जावेद सत्तार शेख यांनी बिनविरोध निवड नुकत्याच झालेल्या ग्रामपंचायत निवडणूक च्या उपसरपंच पदासाठी आज निवडणूक घेण्यात आली. पंधरा ग्रामपंचायत सदस्य असलेल्या सर्वधर्मसमभाव परिवर्तन पनल चे सरपंच बरोबर नऊ सदस्य निवडून आले होते. सर्वधर्म समभाव एकता ग्रामविकास पनलचे सहा सदस्य निवडून आले आहे. सर्वधर्म समभाव परिवर्तन पनलतर्फ जावेद शेख यांचे उपसरपंच पदासाठी १२ वाजेपर्यंत एकमेव अर्ज दाखल झाले होते. दुपारी दोन वाजता सर्वधर्म समभाव परिवर्तन पॅनल चे सरपंच शबाना करीम शेख सह नऊ सदस्य उपस्थित होते. तर दुसरे पॅनल चे सहा सदस्य गैरहजर होते. पिठासन (अध्यसी)अधिकारी गोपाल मधुकर गुजर यांनी जावेद शेख यांना उपसरपंच म्हणून घोषित केले. यावेळी त्यांना तलाठी एम ए मुळे, ग्रामविकास अधिकारी अकतर पटेल यांनी मदत केली. ग्रामपंचायत तर्फ नवनिर्वाचित सरपंच, उपसरपंच, सर्व सदस्य यांना एक एक झाडे भेट म्हणून देण्यात आली. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य सय्यद कलीम, सर्व ग्रामस्थ, जैष्ठ नागरिक, प्रतिष्ठित व्यक्ती उपस्थित होते.



# नादरपुर येथे राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**पिशोर :** कन्नड तालुक्यातिल नादरपूर येथे राष्ट्रमाता माँ साहेब जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नादरपूर येथील शालेय विद्यार्थ्यांनी राष्ट्रमाता जिजाऊ,छत्रपती शिवाजी महाराज,राजे संभाजी महाराज यांची वेशभूषा करून कार्यक्रमाची शोभा वाढविली. या निमित्ताने नादरपूर येथील सुपुत्र श्री सुभाष तेजराव निकम यांची राष्ट्रीय आम आदमी पक्ष औरंगाबाद जिल्ह्याचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा सत्कार समारंभाचा कार्यक्रम ही आयोजीत करण्यात आला होता. तसेच ग्राम पंचायत जवखेडा बु.,गौरपिंप्री,जवखेडा खु. येथील नवनिर्वाचित सरपंच,उपसरपंच,ग्रा.प.कार्यकारी मंडळ यांचा सत्कार करण्यात आला. सदर कार्यक्रमास ग्राम पंचायत नादरपूर कार्यकारी मंडळ, उपाध्यक्ष, सदस्य, तंटा मुक्ती समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य तसेच गावकरी,शालेय विद्यार्थी, शाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक स्टॉप, अंगणवाडी सेविका, मदतनीस, आशा सेविका, पोलीस पाटील, कोतवाल, ग्रामसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून अंकुश उत्तमराव निकम व प्रमुख पाहुणे म्हणून आम आदमी पक्षाचे मराठवाडा संघटक मुंढे साहेब, जिल्हा संघटक चव्हाण साहेब, विठ्ठल पुंडलिक निकम, विठ्ठल रखमाजी निकम तर सचिव म्हणून श्रीयुत सुभाष बनकर साहेब ग्रामसेवक यांनी काम पाहिले.

# निर्भिड उत्कृष्ट पत्रकार सेवा गौरव पुरस्कार' फिरोज शेख यांना जाहीर



आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** येथील पत्रकार फिरोज शेख यांना उत्कृष्ट पत्रकारितेच्या ग्रामीण विकास प्रतिष्ठाण व आपले ज्ञानपंख वृत्तपत्र यांच्या वतीने पत्रकारिता क्षेत्रातील दिला जाणारा सन २०२२ चा राज्यस्तरीय निर्भिड उत्कृष्ट पत्रकार सेवा गौरव पुरस्कार' जाहीर झाला आहे. अध्यक्ष तथा संपादक दशरथ सुरडकर, उपसंपादिका जयश्री सोनवणे, कार्यकारी संपादक प्रविण तायडे यांनी पत्रकार फिरोज शेख (क्राईम रिपोर्टर) यांचे अभिनंदन हे पत्राद्वारे केले आहे. त्यांच्या सर्व संपादक मित्रमंडळी व केंद्रीय पत्रकार संघ महा.राज्य आदींसह सर्वच क्षेत्रांतून अभिनंदन केले जात आहे.



# सावळदबारा येथे जिजाऊ जयंती उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे आज दिनांक 12 जानेवारी 2023 जय कालिंका देवी शिक्षण प्रसारक संस्था संचलित कै लक्ष्मणराव भीमराव कोलते पाटील वरिष्ठ महाविद्यालय व शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय सावळदबारा यांच्या संयुक्त विद्यमाने राजमाता राष्ट्रमाता माँसाहेब जिजाऊ व स्वामी विवेकानंद (राष्ट्रीय युग पुरुष) यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. सर्वप्रथम संस्थेच्या अध्यक्ष भाऊराव लक्ष्मणराव कोलते व संचालक मंडळ सर्व पदाधिकारी यांनी व सचिव श्रीमती रत्नाबाई कोलते यांच्या हस्ते राजमाता यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. शिवाजी माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य व मुख्याध्यापक नारायण रायभान कोलते यांच्या हस्ते। स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. जाधव विनोंद सर, खमाट भास्कर सर शेळके, पंजाबाराव सर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्राचार्य नारायण कोलते सर यांनी सांगितले की, राजमाता जिजाऊ यांनी स्वराज्य स्थापन करण्यासाठी छत्रपती शहाजी राजे महाराज, छत्रपती शिवाजी महाराज व स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या माध्यमातून स्वराज्याची मुहूर्त वेळ कशी लावली व जनतेचे राज्य तयार व्हावे जनतेने जवळ स्वतःचे रक्षण करावे व जनताच सर्व काही ठरवेल असे स्वराज्य निर्माण केले.

अशा स्वराज्यात छत्रपती शिवाजी महाराजांना रामायण व महाभारत यांच्या कथा सांगून शूर व पराक्रम मिळवण्यासाठी कशाप्रकारे कष्ट घ्यावे लागतात कसे गनिमी कावे आखावे लागतात याबद्दल मार्गदर्शन केले. तसेच स्वामी विवेकानंद यांना बालपणापासूनच वाचनाची व धार्मिक ग्रंथाविषयी आवड होती. यामुळे ते अभ्यासात खूप हुशार होते याचे परिणाम म्हणून अमेरिकेतील शिकागो येथे त्यांनी भारताचे प्रतिनिधित्व करणारे ते पहिले भारतीय होते. अशा या महान हुतात्म्यांना आपण विनम्र अभिवादन करूया असे प्रतिपादन करूया. सर्व शिक्षक विकास पाटील, विजय सिंग राजपूत, भास्कर खमाट, श्रीकृष्ण सोनवणे, संजय जोशी, मुकुंदा व्यवहारे, सुदाम राठोड, भास्कर ससाने, विनोद जाधव, पोपटराव सोनवणे, भूषण देसले, प्रा.जीवन कोलते, वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉक्टर जयराम घोटी पंजाबराव शेळके, योगेश थोटे, गणेश मोहने, अजय रबडे, दीपक शिसोदे, गणेश सत्रे, संजय अमृतकर, प्रदीप पाटील, किशोर चोपडे, दगडू कोळी योगेश शेळके सतीश कवडे सतीश चव्हाण सुनिल कुमार चव्हाण मोहन बोरे सतीश गावंडे प'डोल सर तर शिक्षकेतर कर्मचारी श्याम जाधव अजबराव चव्हाण बाबासाहेब कोलते राहुल बडक गजानन चव्हाण इत्यादी उपस्थित होते.

# जिजाऊंचे चरित्र समाजास आदर्श प्रा : जयश्री कुलकर्णी

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** अखिल भारतीय इतिहास संकलन योजना दिल्ली इतिहास संकलन (संस्था) समिती महाराष्ट्र देवगिरी प्रांत महिला विभागाच्या वतीने स्वामी रामानंद तीर्थ अभासी मंचावर GOOGLEMEET वर ONLINE राजमाता जिजाउ जयंती व स्वामी विवेकानंद जयंती निमित्त आयोजित व्याख्यान प्रा. जयश्रीताई कुलकर्णी धाराशीव यांचे आयोजित केले होते यावेळी - राजमाता जिजाउ समग्र जिवन चरीत्र या विषयावर त्यांनी प्रतिपादन केले की राजमाता जिजाउ यानी स्वराज्य निर्माणाचे स्वप्न प्रत्यक्षात आणले छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज घडवले.

त्यांच्या चरित्रातुन आजच्या काळात उपयुक्त जिज्ञासु पणा शोर्य ,धाडस, कणखरपणा दूरदृष्टी ,कठोरपणा, समाजाला प्रेरणादायी आहेत. विविध प्रसंगातुन हे गुण त्यांनी वर्णन केले व समग्र चरीत्र जिजाउचे मांडले स्वराज्यप्रेरिका व स्वराज्य संकल्पपिका राजमाता जिजाऊंचे चरित्र समाजास आदर्श आहे. सुत्रसंचलन प्रा शिला स्वामी व प्रास्ताविक प्रा डॉ शांता जाधवर तर आभार प्रदर्शन प्रा. शशिकांत पसारकर यानी केले. यावेळी प्रमुख उपस्थिती प्रा. डॉ मुकुंद देवर्षी प्रांत कोषाध्यक्ष, प्रा. शशिकांत पसारकर सहसचिव, प्रा. डॉ. अरविंद सोनटक्के, प्रा.डॉ. शांता जाधवर, प्रा. बियाणी, प्रा. नागनाथ सोळंके प्रा किशोर काळुसे, प्रा. डॉ रवी सातभाई, प्रांत युवा प्रमुख, व महाराष्ट्रातील इतिहास अभ्यासक संशोधक इतिहास संकलन संस्था पदाधिकारी व सभासद उपस्थित होते.



# प्रभू रामचंद्र यांच्या मूर्तीची खंडाळा येथे भव्य मिरवणूक

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** जिल्ह्यातील वैजापूर तालुक्यातील खंडाळा येथे शिर्डीच्या साई बाबांचे साई सच्चरीत पारायण सुरू आहे, गुरुवारता,१२/१/२३ रोजी या पारायणची सांगता आहे. त्यानिमित्त येथील साई क्रांतिरत्न व शैक्षणिक मंडळ मार्फत साईबाबा व प्रभू रामचंद्र यांच्या मूर्तीची भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत वैजापूरचे धोंडीरामसिंह राजपूत प्रति साईबाबाच्या रुपात सहभागी होऊन त्यांनी साई भक्तांना शिर्डीच्या साई बाबांची अनुभूती साक्षात साईबाबा बनून दिली. त्यामुळे साई भक्त व गावकरी खूप आनंदित झाले. त्यांच्या समवेत कोते पाटील यांच्या भूमिकेत श्याम उचित होते, तर म्हाळसापतीच्या भूमिकेत सुरेश शेलार होते. बायजामायच्या भूमिकेत पूजा होती. चार तास ही पालखी मिरवणूक चालली. साईबाबा जसे आपल्या भक्त परिवार सोबत द्वारकामाईत जात तसेच साक्षात चित्र खंडाळ्यात पाहायला मिळाल्याने खंडाळावाशी खूप आनंदित होऊन त्यांनी आनंद घेतला, अशोक आप्पा पवार, संतोष पवार, नितीन गायकवाड यांच्यासह साई माऊली ग्रूपचे रामभाऊ उचित यांनी सहभाग नोंदविला.

# महाविकास आघाडीच्या वतीने राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज



**औरंगाबाद :** श्रीराम नगर सिडको येथे राजमाता जिजाऊ व युवकांचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त महाविकास आघाडीच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी शिवव्याख्याते वैभव साबळे पाटील यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. यावेळी महिलांच्या हस्ते राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिनंदन करण्यात आले. तर मुकुंदवाडी पोलीस ठाण्याचे पीआय ससे साहेब यांच्या हस्ते स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करण्यात आले. यावेळी महाविकास आघाडीचे शिवाजी शुक्ला दीपक मस्के वल्लभ भंडारी प्रल्हाद बनसोडे गंगाराम जी कापसे संदिपान काळे बापू अरुण जाधव मामा विजय खरात एस बी शिरसाट आकाश कांबळे गंगाधर आव्हाड, प्रमोद ढाले, लक्ष्मण मुळे, वीर साहेब, अनिल मस्के, अशोक दिवटे, सचिन वाघ, सिताराम मोरे, पाटील, कारभारी बागुल, श्रीमंत गायकवाड, बाळू गाडेकर, शिवा शिंदे जीवन मस्के, जयस्वाल साहेब, नाना जगताप तुकाराम साबळे शकील, पठाण, रामेश्वर शिंदे, संतोष सोनटक्के, भीमराव साहेब सतीश काळे शिवाजीराव काळे मामा राजेंद्र पाटील किशोर गोरे फ्रेंड गाडेकर, भरत जाधव, दिलीप मोरे, संतोष बोडके, लक्ष्मीकांत दाते, रणजीत ठोंबरे, गणेश खाडे चंदू भाऊ काळे उगले काका, बेबीताई कदम, हिवाळीताई, उज्वला मस्के, उगले काकू इत्यादी मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन सूत्रसंचालन सुभाष पांडभरे पाटील यांनी केले आभार प्रदर्शन भंडारी यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लक्ष्मण मुळे, तुकाराम साबळे, काळे मामा, सुभाष शुक्ला, रामेश्वर शिंदे, शिवा शिंदे, उमाकांत शिंदे, मंगेश शिंगारे, अतिश गवळे, रामेश्वर सोनवणे, अतुल खंडगावकर, अतुल इंगळे, ॲड मिलिंद काकडे, सुजित निकाळजे यांनी केले.

# सावित्रीबाई फुले वरिष्ठ महाविद्यालय औराळा येथे सन्मान लेकीचा कार्यक्रमाची सांगता

आधुनिक केसरी न्यूज



**औराळा :** कन्नड तालुक्यातील औराळा येथील ज्ञानदीप शिक्षण संस्था व सावित्रीबाई फुले वरिष्ठ महाविद्यालय औराळा येथे दिनांक ३ जानेवारी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले जयंती पासून ते दिनांक १२ जानेवारी राजमाता जिजाऊ जयंती पर्यंत सन्मान लेकीचा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्रमुख अध्यक्ष म्हणून विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे माजी आमदार तथा जिल्हा मध्यवर्ती बँकेचे चेअरमन नितीन पाटील यांच्या प्रमुख अध्यक्षेखाली सन्मान लेकीचा कार्यक्रमाची सांगता झाली.

ज्ञानदीप शिक्षण संस्था व सावित्रीबाई फुले वरिष्ठ महाविद्यालय वतीने वकृत्व स्पर्धा धावण्याची स्पर्धा रांगोळी स्पर्धा निबंध स्पर्धा रांगोळी स्पर्धा अशा विविध स्पर्धेचे आयोजन सन्मान लेकीचा कार्यक्रमाच्या माध्यमातून ज्ञानदीप इंग्लिश स्कूल औराळा येथील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत आयोजित केले होते. कार्यक्रम प्रसंगी बोलताना विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे म्हणाले की ज्ञानदीप शिक्षण संस्था व सावित्रीबाई फुले वरिष्ठ विद्यालयाने सन्मान लेकीचा या कार्यक्रमाच्या माध्यमातून चांगला उपक्रम राबवला आहे असे उपक्रम प्रत्येक शिक्षक संस्थेने घेतले पाहिजे. जे आज दीपक वारे यांच्या माध्यमातून ज्ञानदीप शिक्षण संस्था उभयाला आली आहे. यावेळी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, माजी आमदार तथा मध्यवर्ती बँकेचे चेअरमन नितीन पाटील, रोटरी क्लब ऑफ चे अध्यक्ष दीपक पवार, माजी जिल्हा परिषद सदस्य डॉ. अण्णासाहेब शिंदे, परिषद सदस्य सुरेश आण्णा गुजराणे, माजी उपसभापती सुनील निकम, बाबा मोहिते, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरेचे तालुकाप्रमुख संजय मोटे, माजी सरपंच चंद्रकांत देशमुख, विकास सोसायटी औराळाचे चेअरमन रमेश कुमार खंडेलवाल, सिताराम तात्या वारे, दीपक वारे योगेश पवार, काकासाहेब काळे, डॉ. नम्रता गायधने, समाधान काळे, सुभाष रिंढे, ग्रामसेविका सुजाता गवई, औराळीचे सरपंच संगीता शिवाजी निकम, औराळा चे सरपंच सोनाली सुरेश बागुल, सतीश जिवरख, गव्हालीचे सरपंच वैशाली रवींद्र काळे, अंकुश निकम, पोलीस पाटील सतीश पगारे वैशाली दीपक वारे सुरेश चव्हाण आदी मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते. सूत्रसंचालन संतोष निकम तर प्रास्ताविक दीपक वारे व आभार सिताराम तात्या वारे यांनी व्यक्त केले.



# राष्ट्रमाता माँ जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** भारतीय कम्युनिस्ट पक्ष व परिवर्तन कॉम्प्युटर्स च्या वतीने जयभवानी नगर विश्रांती नगर येथे राजमाता राष्ट्रमाता माँ जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या संयुक्त जयंती निमित्ताने परिवर्तन कॉम्प्युटर्स येथे अभिवादन कार्यक्रम आयोजित केला होता. या प्रसंगी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे जिल्हा सहसचिव कॉ मधुकर खिल्लारे यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले.

राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या विचारांची उपस्थितांना माहिती दिली.

या वेळी शाखा सहसचिव कॉ संजय अंभोरे विश्रांती नगर जय भवानी नगर घर बचाव संघर्ष समिती चे कॉ गणेश सूर्यवंशी योगिता जाधव, अश्विनी तांगडे, पूजा गाडेकर, अभिषेक रोडे, परमेश्वर ढेंगळे, पल्लवी सोनवणे, ऋतुजा नांगरे, यांच्या सह अनेकांची उपस्थिती होती.

# गडकरी साहेब शेगाव ते पंढरपूर रस्त्यावर प्रवास करून दाखवा

## मनसे जिल्हाध्यक्ष प्रकाश सोळंके यांची तक्रार

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** शेगाव पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ वरील उत्कृष्ट दर्जाच्या कामावरती आपले लक्ष वेधू इच्छितो की ही तक्रार करीत असताना राजकीय आकाश किंबहुना काही हेतू मनात धरून ही तक्रार नाही सत्य परिस्थिती आपल्यापर्यंत पोहोचावी आपण या मार्गाची पाहणी करावी खामगाव ते पंढरपूर या राष्ट्रीय महामार्गावर प्रवास करून गाडीमध्ये बसून चहा पिऊन दाखवा मग आपल्या लक्षात येईल की हा रस्ता पूर्णपणे बोगस झालेला आहे, कारण या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ खामगाव ते पंढरपूर या रस्त्याचे बांधकाम मेघा इंजीनियरिंग इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड हैदराबाद या रस्त्या संबंधित इतर कंपनीने पूर्णपणे बोगस बांधकाम केल्यामुळे मेघा इंजीनियरिंग इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड हैदराबाद या कंपनीकडून बेडच्या कामापासून सिमेंट बांधकाम अतिशय निकृष्ट दर्जाचे केले आहे, उत्तम उदाहरण म्हणजे बांधकाम चालू असताना अनेक वेळा महाराष्ट्र नवनिर्माण सेना पक्षाच्या वतीने जालना जिल्ह्यातील जालना जिल्ह्याच्या शहरातून ९० किलोमीटर मंठा तालुक्यातील सरहद्द वडगाव ते परतुर तालुक्यातील गंगा सावंगी हा रस्ता जातो म्हणून MSRDC यांच्याकडे वेळोवेळी लेखी तक्रार केल्यानंतर सुद्धा काम करण्याच्या पद्धतीमध्ये सुधारणा झाली नव्हती, बेडचे काम करत असताना कंपनीच्या व कंपनीवर नियंत्रण ठेवणाऱ्या लोकांनी आपसात संगणमत करून रस्त्याचे काम केले कारण खोदकाम करताना त्या ठिकाणी कोणतीही लेव्हल घेतलेली नाही, ज्या ठिकाणी काळी ची जमीन आहे त्या ठिकाणी काळीच्या जमिनीमध्ये इस्टिमेट प्रमाणे खोदकाम न करता या रस्त्याचे जुने मटेरियल वापरून त्या रस्त्यात दाबून टाकले म्हणून अनेक ठिकाणी रस्ता खालीवर झाला, खामगाव ते पंढरपूर या रस्त्याची पाहणी केली असता अनेक जाग्यावर रस्त्याला तडे गेले मोठमोठ्या भेगा पडल्या खड्डे पडले या सिमेंट रस्त्यावरच्या खड्ड्यामुळे जड मालवाहतूक प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांच्या टायरचे मोठे नुकसान होत आहे. रस्ता करीत असताना रस्त्यावरती माती मिश्रित वाळू बोगस कंपनीचे सिमेंट इस्टिमेट प्रमाणे साहित्य न वापरल्यामुळे या रस्त्यावरच्या वरच्या भागातील सिमेंटचा थर निघून जात आहे त्याचा दुष्परिणाम म्हणजे या रस्त्यावर धुळीचे प्रमाण खूप आहे. मा.नितीनजी आपण उद्घाटन प्रसंगी सांगितले होते रस्त्याचे काम खराब केले तर कॉन्ट्रॅक्टरला बुलडोझर खाली घाली अशा प्रकारचा विनोद आपण आपल्या भाषणातून केला होता. म्हणून मेघा इंजीनियरिंग इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड हैदराबाद ही कंपनी खूप मोठी कंपनी आहे आपण कंपनीचा विचार न करता आपण आपल्या देशातील नागरिकांचा विचार करून या कंपनीकडून खामगाव ते पंढरपूर या रस्त्याचे नव्याने काम करून घ्यावे या कंपनीवर कारवाई करण्या अगोदर मनसे अध्यक्ष श्रीमान राज साहेब ठाकरे यांच्या वतीने आपणास



विनम्र विनंती करण्यात येते आपण या रस्त्यावरून खामगाव ते पंढरपूर प्रवास करून मगच मेघा इंजीनियरिंग इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड हैदराबाद या कंपनीवर कारवाई करण्याबाबत विचार करावा, या रस्त्याच्या संबंधित MSRDC अधिकारी,मेघा इंजीनियरिंग इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड हैदराबाद या कंपनीवर देखरेख करण्यासाठी नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांवर फसवणूक केल्यामुळे त्यांना दिलेला पगार वसूल करून त्यांच्यावर फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात यावे जेणेकरून अशा प्रकारचे



चुकीचे काम करण्याची हिंमत कोणी करणार नाही, कारण खामगाव ते पंढरपूर या संपूर्ण रस्त्याचे काम खराब झाल्यामुळे मेघा इंजीनियरिंग इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड हैदराबाद या कंपनीसोबत या रस्त्याच्या संबंधित दुसऱ्या कंपनीने काम केले असेल त्यांच्यावर गंभीर स्वरूपाची कारवाई करून रस्त्याचे सिमेंट बांधकाम नव्याने करूण घेण्याबाबत कारवाई करावी कारण या रस्त्यावर वाहन गेल्यानंतर वाहनाच्या पाठीमागे धूळ उडते हि गोष्ट लक्षात घेऊन कठोर कारवाई करण्यात यावी खासबाग म्हणजे या रस्त्यावर भेगा पडल्या खड्डे पडले ते डांबरीकरण साहित्य आणि बुजवले व बुजवणे चालू आहे.

या वरून लक्षात येते या रस्त्याचे काम कसे झाले असेल म्हणून कळकळीची विनंती आहे संबंधित अधिकारी बांधकाम करणाऱ्या कंपन्यावर निर्बंध घालून अधिकारी कायमस्वरूपी बडतर्फ करून कारवाई झालीच पाहिजे ही जनहितार्थ पक्ष म्हणून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची मागणी पर अपेक्षा आहे. गडकरी साहेबांनी राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ या महामार्गावरील खामगाव ते पंढरपूर प्रवास करावा प्रवास करीत असताना चहा पिऊन दाखवावा मग आपल्या लक्षात येईल तसेच या रस्त्याला खड्डे भेगा पडले ते डांबरीकरण साहित्य आणि बसवायचे काम चालू आहे,या रस्त्यावरून वाहन गेल्यानंतर धूळ उडते मग या राष्ट्रीय महामार्गाचे किती बोगस काम झाले असावे म्हणून या रस्त्याचे काम करणाऱ्या एजन्सीज मेघा इंजिनियर इन्फेक्शन लिमिटेड हैदराबाद व इतर संबंधित काम करणाऱ्या कंपन्या यांना ब्लॅक लिस्ट करून या रस्त्याच्या कामाबाबत प्रकाश सोळंके यांनी खूप गंभीर आरोप केलेले आहे सोळंके पुढे म्हणाले की, कोणत्याही परिस्थितीमध्ये या संपूर्ण रस्त्याचे काम झाले पाहिजे नाही तर या रस्त्यावर दळणवळण करणारे विदर्भ मराठवाडा पश्चिम महाराष्ट्रातील जनता या राष्ट्रीय महामार्गावर येऊन बसेल याची नोंद घ्यावी असा इशाराही त्यांनी दिला आहे.



# राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांचे चरित्र प्रेरणादायी : प्रा. पसारकर

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई संचलित स्वा सावरकर माध्यमिक व उच्चमाध्यमिक विद्यालय बीड विज्ञान कला व्यवसाय अभ्यासक्रम विभागात 12 जाने राजमाता जिजाऊ जयंती व युवकांचे प्रेरणा स्थान स्वामी विवेकानंद जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्रमुख वक्ते प्रा. शशिकांत पसारकर यानी राजमाता जिजाउ व स्वामी विवेकानंद यांचे जीवन चरीत्रातील विविध प्रसंगाचे वर्णन केले. मार्गदर्शन करताना सांगितले की राजमाता जिजाऊ यांनी स्वराज्यातील जनतेमध्ये राष्ट्र स्वाभिमान स्वराज्य प्रेरणा निर्माण केली. विवेकानंद यांनी युवकासाठी विचार प्रगल्भ असावे, नैतिकता असावी बाहुमध्ये बल व दंडामध्ये ताकद असावी. ध्येय निश्चित करुन साध्य होई पर्यंत थांबु नका. असा संदेश व प्रेरणा दिली. आजच्या समाजातही राजमाता जिजाउ व स्वामी विवेकानंद यांचे चरित्र प्रेरणादायी होय यावेळी व्यासपिठावर प्रा शशिकांत पसारकर , कार्यक्रम अध्यक्ष पर्यवेक्षक दत्तात्रय तांबारे प्रा. धनजंय देशपांडे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्र संचलन प्रा अजंली देशमुख व आभार प्रदर्शन प्रा संतोष जोशी यानी केले कल्याण मंत्राने घेवुन कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी प्राध्यापक शिक्षक विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती निमित्ताने कार्यक्रमांचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**नंदुरबार :** तालुक्यातील श्री.आप्पासो.आत्माराम धवळू देवरे माध्यमिक विद्यालय विखरण येथे राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले. प्रतिमा पूजन व दिपप्रज्वलन प्रमुख पाहुणे विखरण येथील पोलिस पाटील दिपमाला प्रकाश पाटील, मुख्याध्यापक डी.डी.साळुंके यांनी केले.

विद्यालयातील विद्यार्थी भारत कोळी याने स्वामी विवेकानंदांची भूमिका साकारली. 'राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जीवनकार्यातील प्रेरणादायी प्रसंग' या विषयावर वकृत्व स्पर्धा संपन्न झाली.स्पर्धेचे परीक्षण लिपिक आर.एम.पाटील यांनी केले. ज्यात किर्ती पवार प्रथम, द्वितीय सुवर्णा पाटील तर तृतीय क्रमांक भावेश पानपाटील यांनी पटकावला तर उत्तेजनार्थ बक्षिसाचे मानकरी मानसी पाटील,माया भील हे ठरले.

तत्पूर्वी कार्यक्रमाचे व्याख्याते डी.बी.भारती यांनी स्वामी विवेकानंद यांच्या तर एस.एच.गायकवाड यांनी राजमाता जिजाऊ यांच्या जीवन कार्यातील विविध प्रसंग आपल्या व्याख्यानातून व्यक्त केले.

अध्यक्षीय भाषणानंतर स्वामी विवेकानंदांच्या भूमिकेतून चि भारत कोळी याने विद्यार्थ्यांना ध्येय प्राप्तीसाठी प्रयत्न करत राहण्याचा संदेश दिला. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन कु.भाग्यश्री पाटील, पुनम कोळी रुपल पाटील यांनी तर आभार दिव्याणी पाटील यांनी मानले.



# अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य परिषदेच्या विश्वस्तरीय लेखनस्पर्धेचे निकाल जाहीर

## साहित्यीक बाळासाहेब जोगदंड यांच्यासह मान्यवरांनी केले स्पर्धेचे परीक्षण

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** अखिल भारतीय मराठी शेतकरी परिषद ही शेतकरी नेते मा. शरद जोशी यांच्या विचाराने प्रेरित होवून शेतीविषयक साहित्यावर गेल्या 9 वर्षापासून विचारमंथन साहित्य संमेलनातून, वेगवेगळे परिसंवाद, कवि संमेलन, विश्वस्तरीय लेखनस्पर्धा भरवत असते. ज्या देशातील सर्वात जास्त जनता शेतीवर अवलंबून आहे. त्या देशात शेतीसाहित्य हे फार कमी आहे. हे फार मोठे दुर्दैव आहे. विश्वलेखन स्पर्धेच्या माध्यमातून यावर्षी शेतीविषयक राजकीय धोरण" या विषयावर लेखन साहित्याचे चार प्रकारात साहित्य मागविण्यात आले होते. परंतु देश विदेशातून या स्पर्धेस उत्तम प्रतिसाद लाभला. या सर्व साहित्याचे परीक्षण करण्यासाठी महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यातून मान्यवर साहित्यिक, शेतकरी व विविध क्षेत्रातील मान्यवर परीक्षक म्हणून लाभले यात, बाळासाहेब जोगदंड, औरंगाबाद, अंकुश शिंगाडे, नागपूर, राजेंद्र चुत्तर, पुणे, श्रीम . वंदना ढवळे, बुलढाणा, श्री. रवींद्र मालुंजकर, नाशिक, श्री. पंढरीनाथ रोकडे, औरंगाबाद, श्रीम. मनीषा रिठे वर्धा, श्री. सुधीर बिंदू, परभणी, श्रीम. शुभांगी कळंबे, नागपूर, श्री. सारंग दरणे, वर्धा यांनी विश्वस्तरीय लेखन स्पर्धेचे परीक्षक म्हणून काम पाहिले. या विश्वस्तरीय लेखनस्पर्धेचे निकाल नुकतेच या संमेलनाचे कार्याध्यक्ष साहित्यिक गंगाधर मुटे व स्पर्धासंयोजक साहित्यिक राजेंद्र फंड यांनी जाहीर केले.

**कथालेखन** प्रथम क्रमांक :- सचिन शिंदे, यवतमाळ द्वितीय क्रमांक :- लक्ष्मण लाड, बीड तृतीय क्रमांक :- आशिष वरघणे, वर्धा **रसग्रहण** प्रथम क्रमांक :- राजेंद्र फंड, राहाता, अहमदनगर द्वितीय क्रमांक :- सतीश मानकर, वर्धा **गझल** प्रथम क्रमांक :- सागरराजे निंबाळकर, कल्याण द्वितीय क्रमांक :- महेश मोरे, सातारा तृतीय क्रमांक :- चंद्रकांत कदम, नांदेड गेयरचना प्रथम क्रमांक :- अनिकेत देशमुख, अकोला द्वितीय क्रमांक :- खुशाल गुल्हाने, अमरावती तृतीय क्रमांक :- रंगनाथ तालवटकर वर्धा छंदमुक्त कविता प्रथम क्रमांक :- रावसाहेब जाधव नाशिक द्वितीय क्रमांक :- दत्ता वालेकर बीड तृतीय क्रमांक :- राजेंद्र उदारे पाथर्डी, अहमदनगर छंदोबद्ध कविता प्रथम क्रमांक :- भालचंद्र डंभे वर्धा द्वितीय क्रमांक :- राजेंद्र गवळी अहमदनगर तृतीय क्रमांक :- नरेंद्र गंधारे वर्धा पद्य कविता प्रथम क्रमांक :- रवींद्र दळवी नाशिक द्वितीय क्रमांक :- रझिया इस्माईल जमादार सोलापूर तृतीय क्रमांक :- राजेश जोंजाळ वर्धा पुस्तक समीक्षण प्रथम क्रमांक :- तुळशीराम बोबडे अकोला द्वितीय क्रमांक :- विशाल मोहोळ अमरावती तृतीय क्रमांक :- माधुरी मगर काकडे पुणे वैचारिक लेख प्रथम क्रमांक :- अजित सपकाळ अकोला द्वितीय क्रमांक :- भारती सावंत नवी मुंबई तृतीय क्रमांक :- माधव खलानेकर धुळे. विजेत्या स्पर्धकांचा व परीक्षकांचा सन्मान दि. 21 व 22 जानेवारी 2022 रोजी गुरुकुंज मोझरी जिल्हा अमरावती येथे होणाऱ्या 10 व्या अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलनात करण्यात येईल अशी माहिती संयोजकांकडून देण्यात आली.

# सविता बांबर्डे यांच्या' वणव्यातील बहर' या कादंबरीचे प्रकाशन संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** मनपा शाळेतील शिक्षक अष्टपैलू असतात याचे उदहारण म्हणजे मनपा केंद्रीय विद्यालय हर्सूलगाव या शाळेतील शिक्षिका सविता देविदास बांबर्डे यांनी आपले अध्यापन कार्य पार पाडीत फावल्या वेळेत 'वणव्यातील बहर ' या कादंबरीचे लेखन केले. आज १२ जानेवारी रोजी राष्ट्रमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त युवादीनी म.न.पा. केंद्रीय विद्यालय हर्सूलगाव येथे कादंबरीचा प्रकाशन सोहळा पार पडला. सिडकोच्या मुख्य प्रशासक दीपा मुधोळ तसेच मा.मनपा उपायुक्त नंदा गायकवाड आणि मनपा शिक्षणाधिकारी मा. संजीव सोनार यांच्या हस्ते कादंबरीचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी विस्तार अधिकारी रामनाथ थोरे, मुख्याध्यापिका मा. उर्मिला लोहार यांची कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती होती .

वाचन संस्कृती चा विकास व्हावा यासाठी प्रत्येकाने रोज एक पान तरी वाचलेच पाहिजे असे आवाहन सिडकोच्या मुख्य प्रशासक दीपा मुधोळ यांनी यावेळी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मधुकर टोनपे आणि कामिनी सुरंगळीकर यांनी केले तर आभार प्रदर्शन केंद्रीय मुख्याध्यापिका उर्मिला लोहार यांनी केले. कार्यक्रमासाठी सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले.

# पांढऱ्या सोन्याच्या भावात चढउतार

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** पश्चिम विदर्भात कापसाच्या भावात चढउतार होत आहेत. कापसाची मोठी बाजारपेठ असलेल्या अकोटमध्ये सुमारे साडेआठ ते नऊ हजारापर्यंतचा दर सध्या मिळत आहे. त्यामुळे पश्चिम विदर्भासह मध्य प्रदेशातील उत्पादकांनी अकोट कृषी उत्पन्न बाजार समितीकडे कापूस विक्रीसाठी धाव घेतली. आगामी काळात कापूस १० हजाराच्या विक्री दराकडे झेप घेण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पश्चिम विदर्भात एकेकाळी सर्वाधिक कापसाचा पेरा घेतला जात होता. मात्र, कालांतराने येथील शेतकरी वर्ग सोयाबीन पिकाकडे वळला. पहिल्या क्रमांकावरील कपाशीची पेरणी दुसऱ्या क्रमांकावर घसरली.

# मेहनतीने ध्येय साध्य करा : दीपा मुधोळ

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** मनपा शिक्षण विभागातर्फे विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी व भविष्यात आपले करिअर निश्चित करण्यासाठी वेगवेगळे उपक्रम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत आज दि १२ जाने रोजी स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त व राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त मनपा केंद्रीय विद्यालय हर्सूल येथे सिडकोच्या प्रशासक दीपा मुधोळ यांनी मार्गदर्शन केले. प्रारंभी दीपा मुधोळ व मनपा उपायुक्त नंदा गायकवाड, शिक्षणाधिकारी संजीव सोनार, शिक्षण विस्तार अधिकारी रामनाथ थोरे, मुख्याध्यापिका उर्मिला लोहार, अण्णामृत फाउंडेशनचे सुदर्शन पोटभरे यांनी राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात केली.

प्रास्ताविकामध्ये शिक्षण अधिकारी संजीव सोनार यांनी विद्यार्थ्यांनी जागेपणी स्वप्न बघावेत व ते स्वप्न पूर्ण करण्यासाठी अभ्यास व स्पर्धात्मक परीक्षा याशिवाय पर्याय नाही असे सांगितले. सिडको प्रशासक दीपा मुधोळ यांनी आपल्या मार्गदर्शनामध्ये संत ज्ञानेश्वर, शिवाजी महाराज, विवेकानंद यांनी लहानपणीच ध्येय निश्चित केली आणि कठोर मेहनतीने ती ध्येये साध्य केली. त्याचप्रमाणे तुम्हीपण ध्येय निश्चित करा आणि कठोर मेहनतीने ती ध्येय साध्य करा. मी पण लहानपणी वर्ग आठवीत असताना शाळेत आलेल्या अनिलकुमार या आय .ए .एस. अधिकारी यांना बघून आय.ए.एस. बनण्याचे ध्येय ठेवले आणि कठोर मेहनतीने २०११ आय .ए .एस. बनून ते पूर्ण केले त्याचप्रमाणे तुम्ही पण तुमचे जेही ध्येय असेल ते आजच निश्चित करा आणि कठोर मेहनतीने साध्य करा असे आवाहन सिडकोच्या प्रशासक दीपा मुधोळ यांनी व्यक्त केले. अन्नामृत फाउंडेशन तर्फे संक्रांतीनीमित्त म.न.पा. केंद्रीय विद्यालय हर्सूल येथील विद्यार्थ्यांना तिळगुळ वाटप दीपा मुधोळ व लायन्स संजय गुप्ता यांच्या हस्ते करण्यात आले.

या प्रसंगी मनपा केंद्रीय विद्यालय हर्सूल येथील विद्यार्थी आर्यन राजगुरे फ्रेंच परीक्षेत देशात आकरावा आल्याबद्दल त्याचाही सत्कार करण्यात आला. अध्यक्ष समारोपात उपायुक्त नंदा गायकवाड यांनी आर्यन राजगुरे याचे कौतुक केले व सर्व विद्यार्थ्यांना पाचवी आणि आठवी स्कॉलरशिपच्या परीक्षेत बसण्यासाठी व अभ्यास करण्यासाठी तयारी करण्याचे सुचविले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मधुकर टोनपे आणि कामिनी सुरांगलिकर यांनी केले तर आभार प्रदर्शन केंद्रीय मुख्याध्यापिका उर्मिला लोहार यांनी केले.

# लक्ष्मण तूरेराव यांना उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**धर्माबाद :** कै. दुर्गादास सराफ पत्रकार प्रतिष्ठानच्या वतीने दिला जाणारा भाई केशवराव धोंडगे पत्रकारिता पुरस्कार दैनिक लोकमतचे धर्माबाद तालुका प्रतिनिधी लक्ष्मण तूरेराव



यांना जाहीर झाला आहे. कंधार येथे या पुरस्कारांची नुकतीच घोषणा करण्यात आली. हिंदवी बाणा लाईव्हच्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून दरवर्षी कै. दुर्गादास सराफ पत्रकार प्रतिष्ठानच्या वतीने पत्रकारितेत उत्कृष्ट योगदान देणाऱ्या पत्रकारांचा पुरस्कार देऊन गौरव केला जातो. गेल्या दीड दशकापासून तालुक्यातील शोषित, वंचित, पिडीत, कामगार, शेतकरी, शेतमजुरांच्या न्याय्य हक्कांसाठी, त्यांच्या समस्यांना वाचा फोडण्यासाठी पत्रकारितेत आपली लेखणी झिजविणाऱ्या लक्ष्मण तूरेराव यांना भाई केशवराव धोंडगे पत्रकारिता पुरस्कार जाहीर झाला आहे. तूरेराव यांनी सीमावरती भागातील नागरिकांच्या सामाजिक जीवनाच्या उत्थानासाठी आपल्या लेखणीतून अनेक प्रश्न मार्गी लावण्यासाठी योगदान दिले आहे . मिळालेल्या पुरस्काराबद्दल लक्ष्मण तूरेराव यांचे धर्माबाद तालुका पत्रकार संघासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

# विवाहोच्छुक तरुणाचे थेट आमदारांनाच साकडे

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील मुले लग्नाच्या प्रतीक्षेत असलेल्या अनेक तरुणांना मुलीच मिळत नसल्याने मुंडवळ्या बांधून जिल्हाधिकारी कार्यालयावर आम्हाला बायको मिळवून द्या, अशी मागणी करत काही दिवसांपूर्वी सोलापुरात मोर्चा काढण्यात आला होता. त्यामुळे ग्रामीण भागात सध्या शेतकरी मुलांना लग्नासाठी मुली मिळत नाही हा सामाजिक प्रश्न गंभीर बनला आहे. दरम्यान आता अशाच एका विवाहोच्छुक तरुणाने मुलगी मिळत नसल्याने चक्क आमदारांनाच फोन लावून, तुमच्या मतदारसंघातील मुलगी माझ्यासाठी पाहा, अशी गळ घातली. आमदार आणि या तरुणाच्या संभाषणाची ऑडिओ क्लिप व्हायरल झाली आहे. त्याचे असे झाले की, औरंगाबाद जिल्ह्यातील कन्नड मतदारसंघाचे आमदार उदयसिंह राजपूत यांना खुलताबाद तालुक्यातील एका तरुणाने फोन केला. घरी सर्व काही चांगले आहे. आठ एकर शेतीदेखील आहे. तरीही लग्नासाठी मुलगी मिळत नसल्याबद्दल या तरुणाने दुखः व्यक्त केले. हा तरुण एवढ्यावरच थांबला नाही. तुमच्या भागात माझ्यासाठी मुलगी पाहा, अशी मागणीही त्याने आमदारांकडे केली. यावर राजपूत यांनी त्या तरुणाला नाराज केले नाही. तुझा बायोडाटा पाठवून द्या, मी बघतो असे आश्वासन त्यांनी दिले. दोघांतील संभाषणाची ऑडिओ क्लिप सध्या सोशल मीडियावर चांगलीच व्हायरल होऊ लागली आहे.



# राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**सिल्लोड :** तालुक्यातील अजिंठा येथील महात्मा ज्योतिबा फुले विद्यालयात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात संपन्न झाली. या निमित्ताने विद्यालयात वकृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. वकृत्व स्पर्धेमध्ये 25 विद्यार्थ्यांनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकला व आपल्या वकृत्व गुणाचे कौशल्य सादर केले.

याप्रसंगी विद्यालयाचे जेष्ठ शिक्षक आगारे बी.एम.यांनी विद्यार्थ्यांना राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांचे राष्ट्रासाठी योगदान याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांनी सुचविलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचा अवलंब करून आदर्श व्यक्तिमत्व बनने आजच्या काळाची गरज आहे असे प्रतिपादन अध्यक्षीय समारोपात ज्येष्ठ शिक्षक झेलवार एस.डी.यांनी केले.

याप्रसंगी झालेल्या वकृत्व स्पर्धेत प्राथमिक गटातून प्रथम अपूर्वा सावळे, माध्यमिक गटातून प्रथम - यशस्वी माहोर,आरुषी साळवे व द्वितीय - यश भावसार व उच्च माध्यमिक गटातून प्रथम- नदीम शेख, द्वितीय क्रमांक- प्रणव नरेंद्र खंडेलवाल यांनी पटकाविला. सर्व विजेत्या स्पर्धकांना प्रा.नारायण डिघे व प्रा.एकनाथ जंजाळ यांच्या सहकार्याने राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जीवनचरित्राविषयीचे पुस्तके भेट देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी प्रा.अनंत बुलबुले, डॉ.गोपीनाथ डापके यांनी पर्यवेक्षणाचे काम केले. प्रा.घोंगडे के.एस., भाऊसाहेब जंगले,प्रफुल्ल कळम, संजय पायघन, कृष्णा भंडारे, योगेश गोराडे, किरण मोरे, अरविंद सोनवणे,यांसह श्री अरुण चव्हाण देशमुख प्रदेशाध्यक्ष अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती महाराष्ट्र राज्य हेही उपस्थित होते तसेच प्राथमिक विद्यालयाचे शिक्षकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शितल महाले व वर्षा काळे या विद्यार्थिनींने केले व विद्यालयाचे सांस्कृतिक विभाग प्रमुख गवळी के.एच.यांनी आभार मानले. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची वेशभूषा परिधान केली होती. कार्यक्रमाची सांगता जिजाऊ वंदनाने करण्यात आली.

# माजी नगरसेवक काकासाहेब कवडे यांची रोहनच्या कुटुंबियास मदत



आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील कुट्टी मशीन वर काम करून त्या रोजंदारीच्या पैशातुन सहलीला गेलेल्या साने गुरुजी विद्यालय कन्नडचा विद्यार्थी स्व. रोहन संतोष बेडवाल ब्राह्मणी याचा काशीद बीचवर बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. अत्यंत बिकट परिस्थिती असलेल्या बेडवाल कुटुंबास मदतीचा हात म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा सरचिटणीस तथा माजी नगरसेवक काकासाहेब कवडे यांनी त्यांच्या वाढदिवसाचे सर्व कार्यक्रम रद्द करून त्या पैशातून बेडवाल कुटुंबीयास मदतीचा हात दिला. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी नगर अध्यक्ष संतोष कोल्हे माजी नगरसेवक युवराज बनकर, संतोष निकम, अनिल गायकवाड, रत्नाकर पंडीत यांची उपस्थिती होती .

# घाणेगांव तांडा येथे आश्रम शाळेत राजमाता जिजाऊ यांची जयंती उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील घाणेगांव तांडा येथे प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळेत दिनांक १२ जानेवारी यांच्या संयुक्त विद्यमाने राजमाता राष्ट्रमाता मॉसाहेब जिजाऊ व स्वामी विवेकानंद (राष्ट्रीय युग पुरुष) यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली या कार्यक्रमाचे व प्रमुख पाहुणे यांनी सर्वप्रथम राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन प्र.मु.अ.एस. एल.राडोड यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांचे आदर्श डोळ्यासमोर ठेवून चांगले शिक्षण घ्यावे, असे प्रतिपादन प्र.मु.अ.संजय पाटील यांनी सांगितले. यावेळेस सरपंच सौ.रत्नाताई सुरेश चव्हाण, उपसरपंच हिरा जाधव, मुख्याध्यापक एस.एल. राठोड, मुख्याध्यापक संजय पाटील, अर्जुन चव्हाण व.अधिक्षक, पत्रकार सुनील चव्हाण, अज्ञानसिंग चव्हाण व शाळेतील सर्व शिक्षकबंधू, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते याबद्दल सविस्तर माहिती अर्जुन चव्हाण सर तथा (सामाजिक कार्यकर्ते) यांनी बोलताना दिली.

# गायिका आशिका कुंदनानीचा पहिला म्युझिक व्हिडिओ 'रांझना' लॉन्च

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** गायिका व अभिनेत्री आशिका कुंदनानी हिचा वाढदिवसही भव्य केक कापून साजरा करण्यात आला. गायिका आशिका कुंदनानीचा पहिला म्युझिक व्हिडिओ "रांझना" मुंबईतील लव्ह अँड लट्टे येथे भव्यपणे लाँच करण्यात आला. या प्रसंगी गाण्याचे संगीतकार रितू जोहरी, गीतकार रिचा जोहरी, निर्माते रवी कुंदनानी, गीताचे जीतू शंकर (जीबीएन एंटरटेनमेंट). आणि व्हिडिओ डायरेक्टर सुमित रंजन उपस्थित होते. येथे अनेक सेलिब्रिटी पाहुणे देखील उपस्थित होते, ज्यामध्ये संगीतकार समीर सेन, संगीतकार निखिल कामत, कॉमेडियन व्हीआयपी, गायक दिव्या कुमार उल्लेखनीय आहेत. रितू प्रभा प्रॉडक्शन आणि जीतू शंकर (जीबीएन एंटरटेनमेंट) प्रस्तुत या सुंदर गाण्याच्या लाँच इव्हेंटमध्ये गायिका आणि अभिनेत्री आशिका कुंदनानी हिचा वाढदिवस देखील एक आकर्षक केक कापून साजरा करण्यात आला.

आशिका कुंदनानी म्हणाली की, 'रांझना' हे गाणे खूप चांगले आहे, ज्यामध्ये माझे पात्र आणि लूक खूप वेगळा आहे. लहानपणापासूनच मला गाण्याची आवड आहे, त्यासाठी मी योग्य प्रशिक्षण घेतले आहे. हे गाणे सादर करणे माझ्यासाठी आव्हानात्मक होते कारण त्यात गाण्याबरोबरच मला अभिनयही करायचा होता. पण मी दिग्दर्शक सुमित रंजनचा आभारी आहे की त्यांनी मला हे काम उत्तम पद्धतीने करायला लावलं. जेव्हा मी स्वतःला पडद्यावर पाहतो तेव्हा मला आनंद होतो. हे गाणे जैसलमेरच्या वाळवंटात चित्रित करण्यात आले आहे.

आशिका पुढे म्हणाली की, माझा पहिला व्हिडिओ लॉन्च प्रसंगी आलेल्या सर्व पाहुण्यांचे, संगीतकार समीर सेन, संगीतकार निखिल कामत, कॉमेडियन व्हीआयपी, गायक दिव्या कुमार यांचे मी आभार मानते. हे गाणे एका मुलीबद्दल आहे जी आपल्या प्रेयसीच्या शोधात आहे, हे एक सूफी गाणे आहे ज्यामध्ये भावना आणि वेदना आहेत."



आशिकाला गायनाचा वारसा लाभला आहे. ती गुरू रितू जोहरी यांना तिची आवडती गायिका, गुरू आणि गुरू मानते. संगीतकार रितू जोहरीने सांगितले की, आशिकाने लहान वयातच सांगितले होते की तिला गाण्याची आवड आहे. त्याच्या आवाजात एक विचित्र ओढ आहे. एके दिवशी ती एक सुफी गाणे गुणगुणत होती ज्याने मला खूप प्रभावित केले आणि मला वाटले की आशिकाचे पहिले गाणे सुफी गाणे असावे. अशा प्रकारे रांझना हे गाणे रचले गेले आणि सर्व काही जसेच्या तसे चालू राहिले.

सर्व पाहुणे संगीतकार (दिलीप सेन) समीर सेन, संगीतकार निखिल कामत (निखिल विनय), कॉमेडियन व्हीआयपी, गायक दिव्या कुमार यांनी आशिकाच्या आवाजाचे कौतुक केले आणि तिला तिच्या पहिल्या गाण्यासाठी खूप खूप शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचा जनसंपर्क मुंडे मीडियाने अतिशय चांगल्या पद्धतीने हाताळला.

# आदर्श व्यक्तीचे कार्य समाजाला, नव्या पिढीला प्रेरक

## अतुल किर्लोस्कर यांना 'जीवनगौरव'; डॉ. अरविंद नातू, संदीप कर्णिक, नीता मेहता आदींचा सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** पुण्यात घडलेली प्रत्येक व्यक्ती एक संस्था व विद्यापीठ आहे. एकमेकांच्या साथीने प्रगतीकडे वाटचाल करणाऱ्या अशा आदर्श व्यक्तिमत्वांचे कार्य समाजाला प्रेरक असते. पुरस्कारांच्या माध्यमातून अशा आदर्शांना नव्या पिढीसमोर ठेवले जात आहे, ही चांगली गोष्ट आहे, असे मत सिक्कीमचे माजी राज्यपाल, सातारा लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीनिवास पाटील यांनी केले. टॉप मॅनेजमेंट कन्सॉर्टियमतर्फे विविध क्षेत्रातील मान्यवरांना उल्लेखनीय कार्याबद्दल 'अवॉर्डस ऑफ एक्सलन्स' पुरस्कार पाटील यांच्या हस्ते वितरित करण्यात आले. खराडी येथील हॉटेल रॅडीसन ब्लू येथे झालेल्या सोहळ्यावेळी सौ. बाहरी मल्होत्रा, लेफ्ट. जनरल डॉ. दत्तात्रय शेकटकर, नीलकंठ ज्वेलर्सचे दिलबाग सिंग, 'टीएमसी'चे अध्यक्ष अश्विनी मल्होत्रा, महासचिव डॉ. जयसिंग पाटील, जेनीस सोमजी आदी, सुंद्री परचानी आदी उपस्थित होते. उद्योजक अतुल किर्लोस्कर यांना 'जीवनगौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला. ज्येष्ठ शास्त्रज्ञ प्रा. डॉ. अरविंद नातू (विज्ञान व तंत्रज्ञान), जागतिक आरोग्य संघटनेचे सल्लागार डॉ. सुभाष साळुंके (सार्वजनिक आरोग्य), पुण्याचे पोलीस सहआयुक्त संदीप कर्णिक व भारतीय विमानतळ प्राधिकरणाचे संचालक संतोष ढोके (प्रशासन), टेक्नोक्रॅट आनंद शिराळकर (युवा उद्योजक), पॉवरलिफ्टर नीता मेहता (क्रीडा)



यांना सन्मानित करण्यात आले. श्रीनिवास पाटील म्हणाले, "पुणे विद्येचे, संस्कृतीचे, देवालयाचे माहेरघर आहे. ही संस्कृती आपण जपली पाहिजे. समाजात अनेक गरीब व गरजू लोक आहेत. त्यांच्या सक्षमीकरणासाठी पुढाकार घ्यायला हवा. सर्वांना सोबत घेऊन प्रगतीचा मार्ग साधायला हवा. वाहतूक कोंडीसह पुण्यातील इतर नागरी प्रश्न सोडविण्यावर काम होण्याची गरज आहे." ज्या जिजाऊंनी पुण्याची उभारणी केली, त्यांचे नाव पुण्याला देण्याचा विचारप्रवाह जोर धरतोय, याकडेही त्यांनी लक्ष वेधले.

किर्लोस्कर ग्रुपच्या माध्यमातून उभारलेल्या कार्याचा हा गौरव असून, त्याचा नम्रपणे स्वीकार करत असल्याची भावना अतुल किर्लोस्कर यांनी व्यक्त केली. संदीप कर्णिक, संतोष ढोके, आनंद शिराळकर, डॉ. सुभाष साळुंके यांनीही सत्काराला उत्तर देत आपली मनोगते व्यक्त केली. अश्विनी मल्होत्रा यांनी प्रास्ताविक केले. जुही मेश्राम यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. जयसिंग पाटील यांनी आभार मानले.

# १ एप्रिलपासून PM किसानचे पैसे वाढणार

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरातील शेतकऱ्यांना १ फेब्रुवारी २०२३ रोजी सादर होणाऱ्या आगामी अर्थसंकल्पाकडून नोकरदार आणि शेतकरी दोघांनाही मोठ्या आशा आहेत. यावेळी नोकरी व्यवसाय करणाऱ्यांना आयकर सवलतीच्या बाबतीत दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. याशिवाय शेतकऱ्यांसाठी एक आनंदाची बातमी येत आहे. यावेळी सर्वांच्या नजरा अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या घो- षणेकडे असतील. २०२४ च्या निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून सरकारकडून अनेक लोकप्रतिनिधी आश्वासने दिली. जाऊ शकतात. सरकार शेतकऱ्यांना मोठी भेट देऊ शकते. या अर्थसंकल्पात केंद्र सरकार शेतकऱ्यांना मोठी भेट देऊ शकते, असा दावा सूत्रांनी केला आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन शेतकऱ्यांसाठी पीएम किसान निधीची रक्कम वाढवण्याची घोषणा करू शकतात. पीएम किसान सन्मान निधी मध्ये दरवर्षी मिळणाऱ्या ६ जातील. म्हणजेच शेतकऱ्यांना हजार रुपयांच्या रकमेत वाढ होण्याची अपेक्षा असल्याचे वार्षिक देण्यात येणार आहेत. सूत्रांचे म्हणणे आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्याच्या उद्देशाने सरकार हा निर्णय घेऊ शकते.६००० रुपयांऐवजी ८००० रुपये ३ ऐवजी ४ वेळा पैसे मिळतील शेतकऱ्यांना तीन हप्त्यांमध्ये शेतकऱ्यांच्या दिलेली रक्कम ३ ऐवजी ४ पट दिली जाऊ शकते, असेही सांगण्यात येत आहे. यामध्ये प्रत्येक तिमाहीत २००० रुपये देणे अपेक्षित आहे. सध्या दर चार महिन्यांनी शेतकऱ्यांच्या खात्यावर २००० रुपये वर्ग केले जातात. मात्र बदलानंतर दर तिमाहीला २००० रुपये दिले. पीएम किसान सन्मान निधीचा १३ वा हप्ता जानेवारी २०२३ मध्येच येणे अपेक्षित आहे. यापूर्वी १२ थेट खात्यावर शासनाकडून जमा करण्यात आले आहेत. बियाणे आणि खतांच्या किमतीत सातत्याने वाढ होत असल्याने शेतकऱ्यांना पैशांची गरज आहे. पीएम किसानची रक्कम वाढवल्यास एप्रिलमध्ये शेतकऱ्यांच्या खात्यात पुन्हा २००० रुपयांचा हप्ता येणे अपेक्षित असल्याची माहिती जिल्हा परिषद सदस्य गोपीचंद जाधव यांनी बोलताना सांगितले.



द एम जी एम स्कूल ला जिल्हास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत तिहेरी मुकुट मेजर कुलथे डिफेन्स एज्युकेशन इंस्टिट्यूट, द एम जी एम स्कूल संयुक्त विद्यमाने संघ व्हॉलीबॉल १७ वर्षा खालील मुले प्रथम क्रमांक, १९ वर्षा खालील मुले प्रथम क्रमांक, १९ वर्षांखालील मुली प्रथम क्रमांक अशी कामगीरी केली. डायरेक्टर, द एम जी एम स्कूल श्री. रणजित कक्कड, प्रेसिडेंट मेजर कुलथे डिफेन्स एज्युकेशन इंस्टिट्यूट, मेजर चंद्रसेन कुलथे, प्रिंसिपल सौ. सुनिता उदगीरकर, सेंटर हेड श्री घनश्याम सिंग, प्रशिक्षण अधिकारी अजय पाटील, शारीरिक शिक्षण प्रशिक्षक अनिकेत तायडे, क्रिडा प्रशिक्षक लोकेश ठाकरे यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# शिरपूर तालुका पोलिसांची दमदार कारवाई शस्त्रसाठा व लाखोचा मुद्देमाल जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शिरपूर तालुका पोलिसांनी धूम स्टाईल पाठलाग करत गावठी कट्ट्यांची अवैधपणे तस्करी करणाऱ्या टोळीला केले जेरबंद

यात तीन पिस्टल, ६ काडतुसांसह ७ लाख ६६ हजाराचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. याबाबत अपर पोलिस अधिक्षक किशोर काळे , सहाय्यक पोलिस अधिक्षक ऋषिकेश रेड्डी यांनी माहिती दिली. सपोनि सुरेश शिरसाठ यांना गुप्त माहिती मिळाली की, शिरपुर तालुक्यातील भोईटी गावातून एक क्रुझर कारमधून काही जण गावठी कट्टे घेवून शिरपुरकडे जात आहेत . त्यावरुन तत्काळह सपोनि शिरसाठ यांनी वरीष्ठांना माहिती देत त्वरीत पोलिस पथक तयार करुन भोईटी गावाकडे रवाना झाले. कार क्र . एमएच १५ - सी टी ५६८८ हि दिसताच ती थांबवण्याचा प्रयत्न केला. मात्र कार चालकाने न थांबवता कार भरधाव पळवली , तीचा पाठलाग करीत पोलिसांनी भोईटी गावाजवळ अडवली. कारमधील तरुणांच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने पोसई संदीप पाटील यांनी त्यांची विचारपूस केली. तसेच गाडीची तपासणी केली असता कारच्या शिटच्या खाली लपवून ठेवलेल्या ३ गावठी पिस्तुल, मॅगझीनसह तसेच एक अतिरिक्त मॅगझीन आणि ६ जिवंत काडतुस मिळून आले. पोलिसांनी ७५ हजारांच्या पिस्तुल ५ हजार रुपयांचे अतिरिक्त मॅगझीन , ६ हजारांचे ६ काडतुस , १ लाख ८० हजारांचे ७ मोबाईल , ५ लाखाची शेवरलेट कंपनीची क्रुझ गाडी असा एकुण ७ लाख ६६ हजारांचा मुद्देमाल हस्तगत केला.





# बोरिवली स्केटिंग रिंक, बॉक्सिंग आणि बास्केटबॉल क्रीडा संकुलाचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** बोरिवली येथे आंतरराष्ट्रीय स्तरावरील बोरिवली स्केटिंग रिंक, बॉक्सिंग आणि बास्केटबॉल क्रीडा संकुलाचे उद्घाटन बोरिवलीचे आमदार सुनील राणे यांच्या संकल्पनेतून श्री आशिष शेलार आमदार व अध्यक्ष भाजपा मुंबई यांच्या हस्ते पवनधाम, महावीर नगर, कांदिवली वेस्ट डोनजवळ. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार आशिष शेलार उपस्थित होते. कार्यक्रमाचे माननीय अतिथी आमदार श्री सुनील राणे, उपायुक्त झोन 7, बीएमसी सौ भाग्यश्री कापसे, सरचिटणीस - आईस स्केटिंग असोसिएशन ऑफ इंडिया श्री जे.एस. साहनी, कुस्तीपटू-ऑलिम्पिक ऍथलीट श्री नरसिंह पंचम यादव आंतरराष्ट्रीय स्तरावरील बोरिवली स्केटिंग रिंक, बॉक्सिंग आणि बास्केटबॉल क्रीडा संकुलाचे उद्घाटन करण्यासाठी उपस्थित होते. सुनील राणे यांच्या नेतृत्वाखाली विशेषतः तरुणांसाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचे अत्याधुनिक क्रीडा संकुल उभारण्यात आले आहे. या आधुनिक क्रीडा संकुलातून अनेक दर्जेदार खेळाडू तयार होतील आणि बोरिवली हे राज्य आणि देशासाठी क्रीडा क्षेत्रात नावाजलेले नाव म्हणून उदयास येईल, यात शंका नाही. यावेळी बोलताना सुनील राणे म्हणाले, "गेल्या वर्षी आम्ही बोरिवलीसाठी अत्याधुनिक क्रीडा संकुलाची घोषणा केली होती आणि आज आम्ही बोरिवलीतील स्थानिक नागरिकांसाठी आंतरराष्ट्रीय स्तरावरील बोरिवली स्केटिंग रिंक, बॉक्सिंग आणि बास्केटबॉल क्रीडा संकुलाचे उद्घाटन करत आहोत. तरुणांना शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या तंदुरुस्त बनवण्यासाठी अनेक आरोग्य प्रकल्प राबविण्यात येत आहेत जेणेकरून ते त्यांच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवनात उत्कृष्ट कामगिरी करू शकतील.



# चाळीस वर्षांपूर्वी दुमदुमला होता मंत्र, 'हिंदू सारा एक...'

## तळजाई पठारावरील पस्तीस हजार संघस्वयंसेवकांच्या शिबिराला चाळीस वर्षे पूर्ण

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** पुण्यातील तळजाई टेकडीच्या पठारावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने भरवलेल्या 'प्रांतिक शिबिरा'ला शनिवारी (१४ जानेवारी) चाळीस वर्षे पूर्ण होत आहेत. तळजाईच्या पठारावर दोनशे एकर जागेवर हे शिबिर उभारण्यात आले होते आणि १४ १५ १६ जानेवारी १९८३ असे तीन दिवस चाललेल्या या शिबिरात तब्बल पस्तीस हजार संघस्वयंसेवकांची उपस्थिती होती. शिबिराला चाळीस वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने स्वयंसेवकांकडून या शिबिराच्या आठवणी जागवल्या जाणार आहेत. पुणे शहर, पश्चिम महाराष्ट्र, मुंबई, कोकण, गोवा, संभाजीनगर, मराठवाडा, नाशिक आणि खान्देश या भागातील बावीसशे चाळीस गावांमधून या शिबिरासाठी संघस्वयंसेवक आले होते. शिबिराच्या उभारणीसाठी शेकडो स्वयंसेवक



तळजाईच्या पठारावर दोन महिने रात्रंदिवस राबत होते. शिबिराला आलेल्या स्वयंसेवकांसाठी छत्तीस

> पस्तीस हजार स्वयंसेवकांची उपस्थिती, समाजाकडून मिळालेला अभूतपूर्व प्रतिसाद आणि पुणेकरांनी शिबिराला आलेल्या स्वयंसेवकांसाठी मोठ्या प्रेमाने दिलेल्या लाखो गुळाच्या पोळ्या ही या शिबिराची खास वैशिष्ट्य ठरली. या शिबिराने कार्यकत्यांना उत्साह मिळाला. संघकार्याला मोठी गती मिळाली. शिबिराने 'हिंदू सारा एक...' हा मंत्र महाराष्ट्राला दिला. **सुरेश उर्फ नाना जाधव, प्रांत संघचालक, रा. स्व. संघ, पश्चिम महाराष्ट्र प्रांत**

स्वयंपूर्ण नगरे उभारण्यात आली होती. एका नगरात एक हजार स्वयंसेवकांची निवास, भोजन आदी सर्व व्यवस्था होती, अशी माहिती संघाचे पश्चिम महाराष्ट्र प्रांत कार्यवाह डॉ. प्रवीण दबडघाव यांनी शुक्रवारी दिली.

संक्रांतीच्या निमित्ताने शिबिराला आलेल्या सर्वांना गुळाच्या पोळ्यांचे भोजन देण्यात आले होते. या गुळाच्या पोळ्या पुण्यातील घराघरांमधून संकलित करण्यात आल्या होत्या. या उपक्रमाला पुणेकर माता-भगिनींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला होता आणि सुमारे पावणेदोन लाख गुळाच्या पोळ्या शहरातून संकलित झाल्या होत्या, असेही डॉ. दबडघाव यांनी सांगितले. संघाच्या कार्याचे आणि संघाकडून चालवल्या जाणाऱ्या सेवाकार्यांचे दर्शन घडवणारे चारशे चित्रांचे 'संघदर्शन' हे प्रदर्शन, शिवधनुष्याच्या आकाराचे प्रवेशद्वार, पृथ्वीच्या आकाराचे आणि त्यावर शेषशाही नागाने फणा धरलेले दोन मजली भव्य व्यासपीठ ही या शिबिराची आकर्षणे ठरली होती. 'संघदर्शन' प्रदर्शनाला तीन दिवसात तीन लाख नागरिकांनी भेट दिली होती, अशीही माहिती डॉ. दबडघाव यांनी दिली. तत्कालीन सरसंघचालक मा. बाळासाहेब देवरस यांच्यासह संघाचे अनेक केंद्रिय अधिकारी या शिबिरात उपस्थित होते आणि शिबिरात १४ जानेवारी रोजी झालेल्या मकरसंक्रमण उत्सवाच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध साहित्यिक, 'स्वामी'कार रणजित देसाई यांची उपस्थिती होती. डॉ. अरविंद लेले यांनी लिहिलेले 'हिंदू सारा एक...' हे गीत या शिबिरात स्वयंसेवकांनी एकसुरात गायले. विख्यात संगीतकार आणि गायक सुधीर फडके यांनी ते व्यासपीठावरून गायले होते आणि प्रसिद्ध संगीतकार राम कदम यांनी हे गीत स्वरबद्ध केले होते. शिबिराच्या निमित्ताने पुण्यातून १६ जानेवारी रोजी दोन भव्य पथसंचलने काढण्यात आली होती. या संचलनांचेही शहरात जागोजागी स्वागत करण्यात आले होते. या शिबिराला चाळीस वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने पुण्यातील स्वयंसेवकांकडून या शिबिराच्या आठवणींना उजाळा दिला जाणार आहे. शिबिराची संपूर्ण माहिती देणारी एक फिल्मही तयार करण्यात आली असून ती समाजमाध्यमातून प्रसारित करण्यात येत असल्याचे डॉ. दबडघाव यांनी सांगितले.



# नशेची औषध विकणारा ताब्यात

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** मुंबई आग्रा हायवेवरील सर्विस रोडवर चौधरी पेट्रोल पंपच्या जवळ अंधारात यामा मोटरसायकल वरील तीन अनोळखी इसमानी फिर्यादी यांना थांबवून चाकूचा दात दाखवून वीस हजार रुपयाची मागणी केली पैसे दे नाहीतर तुझा गेम करून टाकू अशी धमकी दिली फिर्यादीने नकार दिल्याने तीन व्यक्तींनी मारहाण करून मोटरसायकल मोबाईल व रोख रक्कम हिसकावून पसार झाले त्यानंतर त्यांच्या विरोधात चाळीसगाव रोड पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंदवला गुन्ह्याचा तपास करीत गुप्त बातमीदाराच्या साह्याने हे आरोपी पकडण्यात आला सदर आरोपींचे नाव महंमद सलीम अन्सारी राहणार वडजाई रोड याला शंभर फुटी रोड वरून पकडण्यात आले एकूण 95 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला ह्या आरोपीला 24 तासाच्या आत अटक करण्यात आले व दोन आरोपी फरार असून त्यांचा शोध सुरू आहे. सध्या तरुण पिढी नशेच्या आमिशात येऊन गुन्हेगारी करत आहे या अनुषंगाने पोलीस अधीक्षक संजय बारकुंड यांच्या आदेशावरून नशेले पदार्थ विक्रीवर कारवाई करण्यासंदर्भात आदेश दिले . त्या अनुषंगाने चाळीसगाव रोड पोलीस स्टेशन यांनी मोठी कारवाई केली अवैध प्रकारे गुंगी आणणारी औषध व गोळ्या विक्री करणारे इसमाची माहिती काढून अंबिका नगर येथील सुलतान युसुफ शेख वडजाई रोड जवळ गुंगी आणणारे औषध बाटल्या विक्री करताना रंगेहात पकडले सदर आरोपीकडून एकूण 55,420 रुपये मुद्देमाल जप्त करण्यात आला व याच्यावर 328 276 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून बोलण्याचा पुढील तपास पवार हे करत आहेत. सदरची कारवाई मा पोलीस अधिक्षक, संजय बारकुंड, अप्पर पोलीस अधिक्षक किशोरकुमार काळे सारे, सहा पोलीस अधीक्षक ऋषीकेश रेडडी, हेमंत पाटील, विशाल मोहने, चेतन झोळेकर, इंद्रजीत वैराट, स्वप्निल सोनवणे, शरद जाधव अशांनी केली आहे.

# देवळीच्या उपसरपंचपदी शेख नगिनाबी जावेद यांची निवड


आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** तालुक्यातील लासूर स्टेशन जवळील देवळी/महंमदपूर मंजरपूर ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदाची निवडणूक सरपंच सुनिल वंजारे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेऊन पार पडली! यावेळी शेख नगिनाबी शेख जावेद यांची उपसरपंचपदी निवड झाली अध्यासी अधिकारी म्हणून मंडळ अधिकारी गणेश कुलकर्णी यांनी काम पाहिले तर ग्रामसेविका श्रीमती दळवी यांनी सचिव म्हणून काम केले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य नवनाथ आहेरे, शफीक शेख,ज्ञानेश्वर कऱ्हाळे,युवराज वंजारे, सर्व श्रीमती शारदा संतोष तायडे, पद्माबाई सुभाष जाधव, पुजा संजय कर्हाळे, मुमताज मुसा पठाण हे सर्व जण हजर होते. नवनिर्वाचित उपसरपंच नगिनाबी शेख यांचे दादासाहेब तायडे, चंद्रभान तायडे, भाऊसाहेब चिंधे, एकनाथ भानुदास तायडे,अशोक तायडे,हिरालाल आहेरे कारभारी भुसारे, उमेश तायडे, संतोष तायडे, वसंत जाधव, म्हसू वंजारे , विठ्ठल घिटरे, बाबासाहेब घिटरे, मोहसीन शेख, हसन शेख, न्यामद शेख, कडूभाई शेख, इब्राहिम शेख यांच्यासह असंख्य गावकऱ्यांनी अभिनंदन केले असून पुढील राजकीय वाटचालीस शुभेछया दिल्या आहेत.

> सरपंच सुनिल वंजारे यांच्या अध्यक्षतेखाली बैठकित उपसरपंच म्हणुन सर्वांनी माझ्या नावाला पसंदी देऊन उपसरपंच म्हणुन माझी निवड केली त्यामुळे मला सहकार्य करणाऱ्या सर्व हितचिंतकाचे आभार व यापुढे सर्व गावाकऱ्यांच्या हिताच्या योजना त्यांच्या मार्गदर्शनाखाली राबून गावचा विकास करणार असून गावकरी, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य व जेष्ठ मार्गदर्शक मंडळी यानी जो विश्वास माझ्यावर टाकला त्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही.
> **शेख नगिनाबी जावेद (नवनिर्वाचित उपसरपंच, देवळी)**



काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

व्यवसायाला द्या, अधिक गती...



करंट अकाऊंट उघडा
6% व्याजदर मिळवा!
पैशाने पैसा मिळवून देणारे खाते!
राजस्थानी मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सो. लि., परळी वैजनाथ
• बँकींग • आरोग्य • शिक्षण • रियल ईस्टेट • इन्शुरन्स
• मुख्य कार्यालय व शाखा : मोंढा मार्केट, परळी वै., जि.बीड मो : 9130072178/9130072188
• कॉर्पोरेट ऑफिस : पहिला मजला, जालना रोड, आकाशवाणी, औरंगाबाद मो : 9130072176